पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

# प्रसिध्दी विभाग

## वार्षिक अहवाल

## 2024-25

प्रसिध्दी विभागप्रमुख,

प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ

| अ.क्र. | दिनांक | नियोजित कार्यक्रम दिनांक | बातमी प्रसिद्धी दिनांक | फेसबुक पेज / वृत्तपत्र प्रसिद्धी |
|---|---|---|---|---|
| 1 | 21/06/2024 | योग दिवस साजरा | 21/06/2023 | फेसबुक पेज |
| 2 | 25/06/2024 | यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रवेश प्रक्रिया जाहिरात प्रसिद्धी | 25/06/2024 | फेसबुक पेज |
| 3 | 26/06/2024 | छ. शाहू महाराज जयंती | 26/06/2024 | फेसबुक पेज |
| 4 | 03/07/2024 | श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात सावता माळी महाराज यांच्या पुण्यतिथी व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीचे आयोजन | 03/07/2024 | फेसबुक पेज |
| 5 | 18/07/2024 | 'एक पेड मॉ के नाम' उपक्रमांतर्गत गणोरी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षारोपण | 18/07/2024 | फेसबुक पेज |
| 6 | 26/07/2024 | सहविचार सभा २०२४-२५ चे आयोजन | 28/07/2024 | फेसबुक पेज<br>दै.सकाळ |
| 7 | 28/07/2024 | शिक्षकांनी विध्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमता, कौशल्य, सकारात्मकता, दुर्दम्य आशावाद, अस्तित्व भान, वाढविण्याचा प्रयत्न करावा-मा .नाना | 28/07/2024 | फेसबुक पेज |
| 8 | 15/08/2024 | स्वातंत्र्य दिनानिमित्त  व्याख्यान-प्रा.बाबासाहेब लहाने | 15/08/2024 | फेसबुक पेज |
| 9 | 15/08/2024 | माजी विद्यार्थी संघाच्या बैठकीचे आयोजन | 15/08/2024 | फेसबुक पेज |
| 10 | 17/08/2024 | राज्यस्थानचे महामहीम राज्यपाल मा .श्री हरिभाऊजी बागडे नाना यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धा | 17/08/2024 | फेसबुक पेज<br>दै.सकाळ- |
| 11 | 22/08/2024 | अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने विद्यार्थी संवाद कार्यशाळेचे) विद्यार्थी उदबोधन वर्ग (आयोजन | 22/08/2024 | फेसबुक पेज |
| 12 | 23/08/2024 | डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा | 23/08/2024 | फेसबुक पेज |
| 13 | 29/08/2024 | अंतर्गत गुणवत्ता निर्धारण केंद्र व महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने 'संविधान : मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्य' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन | 29/08/2024 | फेसबुक पेज |
| 14 | 04/09/2024 | विज्ञान शाखेच्या वतीने" अविष्कार क्लब"चे उदघाटन | 04/09/2024 | फेसबुक पेज |
| 15 | 05/09/2024 | राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस" शिक्षक दिन "अर्थात स्वयंशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. | 05/09/2024 | फेसबुक पेज |
| 16 | 05/09/2024 | सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ उदघाटन व संशोधन व विकास कक्ष व्याख्यानाचे आयोजन | 05/09/2024 | फेसबुक पेज |
| 17 | 17/09/2024 | हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन व्याख्यान कार्यक्रम | 19/09/2024 | फेसबुक पेज<br>दै.म.टा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 18 | 25/09/2024 | अर्थशास्त्र विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ जयंती साजरी करण्यात आली. | 26/09/2024<br>30/09/2024 | फेसबुक पेज<br>दै.म.टा.<br>दै.दिव्य मराठी |
| 19 | 28/09/2024 | अर्थशास्त्र विभागाच्या वतीने" संशोधन पद्धती "या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन | 28/09/2024 | फेसबुक पेज |
| 20 | 07/10/2024 | मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन केंद्र, छ .संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन | 07/10/2024 | फेसबुक पेज |
| 21 | 17/10/2024 | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या 2024 - 2025 या वर्षीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन ‘एनईपीत’ कौशल्य प्रशिक्षणावर भर-डॉ.सचिन मोरे | 18/10/2024 | फेसबुक पेज<br>दै.म.टा. |
| 22 | 06/12/2024 | नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी :एकाधिक प्रवेश आणि एकाधिक निर्गमन या विषयावरील कार्यशाळा संपन्न | 06/12/2024 | फेसबुक पेज |
| 23 | 03/01/2025 | राष्ट्रीय सेवा योजना शिबीर दिनांक ०३ ते ०९ जानेवारी २०२५ दरम्यान मौजे गणोरी ता .फुलंब्री जि . छ .संभाजीनगर येथे सुरु आहे .या शिबिराचे उदघाटन | 06-12/01/2025 | फेसबुक पेज<br>फुलंब्री समाचार |
| 24 | 06/01/2025 | वाचन पंधरवडा उत्साहात | 09/01/2025 | दै.म.टा. |
| 25 | 09/01/2025 | 'युथ फॉर डिजिटल लिटरसी व युथ फॉर माय भारत' ही संकल्पना घेऊन दिनांक ०३ जानेवारी २०२५ पासून सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचा समारोप | 10/01/2025 | फेसबुक पेज<br>दै.म.टा. |
| 26 | 11/01/2025 | मराठी विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ, डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ . संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'एकदिवसीय नवोदित लेखकांसाठीच्या कार्यशाळे'चे आयोजन | 15/01/2025 | फेसबुक पेज<br>दै.म.टा. |
| 27 | 13/01/2025 | 'स्कुल कनेक्ट-2 व वाचन संकल्प कार्यशाळे' चे आयोजन | 13/01/2025 | फेसबुक पेज |
| 28 | 14/01/2025 | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी दरेगाव) दरी(, येथे 'पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन | 17-23/02/2025 | फेसबुक पेज<br>फुलंब्री समाचार |
| 29 | 15/01/2025 | वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने, दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी डॉ .जगदीश्चंद्र बोस व्याख्यानमालेचे आयोजन | 15/01/2025 | फेसबुक पेज |
| 30 | 16/01/2025 | अर्थशास्त्र विभागाच्या वतीने, दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी 'डॉ .बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाले' चे आयोजन | 16/01/2025 | फेसबुक पेज |
| 31 | 17/01/2025 | पद्मभुषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर स्मृतिप्रीत्यर्थ पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व शांतीनिकेतन प्रतिष्ठान किनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने, 'फुलंब्री संगीत महोत्सवाचे' उदघाटन | 16/01/2025<br>17/01/2025<br>17/01/2025 | फेसबुक पेज<br>नवमहाराष्ट्<br>दै.दिव्य मराठी<br>दै.म.टा. |
| 32 | 17/01/2025 | फुलंब्रीत किक बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन | 18/01/2025 | दै.लोकमत<br>दै.सकाळ |
| 33 | 18/01/2025 | वार्षिक स्नेह संमेलनाचा समारोप | 18/01/2025 | फेसबुक पेज |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 34 | 19/01/2025 | "द फोक अख्याना"-मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाची लोकगीते व लोकसंगीताच्या मेजवानीने सांगता | 21/01/2025<br>25/01/2025 | फेसबुक पेज<br>दै.पुण्य नगरी<br>दै.म.टा. |
| 35 | 24,25/01/2025 | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने, दोन दिवसीय 'विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळे' चे आयोजन | 26/01/2025 | फेसबुक पेज<br>दै.दिव्य मराठी |
| 36 | 26/01/2025 | प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान-प्रा.डॉ .प्रभू जगताप | 26/01/2025 | फेसबुक पेज |
| 37 | 13/02/2025 | प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान यांच्या अर्थसहाय्याने<br>पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड मराठी विभागाच्या वतीने आभासी दृदृश्य प्रणालीच्या माध्यमातून<br>राष्ट्रीय ई-वेबिनार -'संत साहित्य व भारतीय ज्ञान परंपरा' | 13/02/2025 | फेसबुक पेज |
| 38 | 15/02/2025 | "गुणवत्ता सुधारणा व सर्वंकष मूल्यमापन "या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा | 15/02/2025 | फेसबुक पेज |
| 39 | 19/02/2025 | इतिहास विभागाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. | 20/02/2025 | फेसबुक पेज<br>दै.महाराष्ट्र टाइम्स |
| 40 | 20/02/2025 | आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' चे औचित्य साधून दरेगाव) दरी(, ता .फुलंब्री या गावात शिवनीतीचे अभ्यासक, डॉ .दिनेश कचकुरे यांचे समाज प्रबोधनपर व्याख्यान संपन्न | 02/03/2025 | फेसबुक पेज<br>फुलंब्री समाचार |
| 41 | 24/02/2025 | "भारतातील सामाजिक संस्थांचे रूपांतर "या विषयावरील परिसंवाद यशस्वीपणे संपन्न | 25/02/2025<br>27/02/2025 | फेसबुक पेज<br>दै.दिव्य मराठी<br>दै.म.टा. |
| 42 | 27/02/2025 | पी .एम .उषा उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत 'महिला वसतिगृह ईमारत, ग्रंथालय ईमारत व सभागृह ईमारती' चा भूमीपूजन सोहळा | 28/02/2025 | फेसबुक पेज<br>दै.म.टा. |
| 43 | 28/02/2025 | "भारताची ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक संस्कृती "या विषयावर सामंजस्य कराराअंतर्गत दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन | 03/03/2025 | फेसबुक पेज<br>दै.दिव्य मराठी |
| 44 | 05/03/2025 | मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन | 05/03/2025 | फेसबुक पेज |
| 45 | 04/04/2025 | पदवी प्रदान समारंभ सोहळा | 07-13/04/2025<br>09/04/2025 | फेसबुक पेज<br>फुलंब्री समाचार<br>दै.म.टा. |
| 46 | 14/04/2025 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी | 14/04/2025 | फेसबुक पेज |

प्रसिध्द बातम्या ---32---

फेसबुक पेजवरील बातम्या ---46---

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील कार्यक्रम व उपक्रमांची निवडक छायाचित्रे



**26.07.2024** रोजी सहविचार सभा प्रसंगी उपस्थित मान्यवर



मा.श्री.हरिभाऊ बागडे (नाना) यांना राज्यस्थान राज्याचे राज्यपाल म्हणून देण्यान आला याबद्दल सत्कार करतांना पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, मा.देवजीभाई पटेल, सचिव, मा.श्री.निवृत्ती गावंडे पाटील, मा.श्री.सर्जेराव ठोंबरे व संचालक मंडळ आणि इतर मान्यवर

Publicity Department, Shri Sant Savta Mali Gramin Maha., Phulambri
July 29, 2024 ·

शिक्षकांनी विध्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमता, कौशल्य, सकारात्मकता, दुर्दम्य आशावाद, अस्तित्व भान, वाढविण्याचा प्रयत्न करावा-मा. नाना

दिनांक २८ जुलै २०२४ रोजीच्या पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, छ. संभाजीनगर येथील अधिव्याखता, मा. श्री रवी कोरडे यांची उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी पी. ई. एस. मॉडर्न इंजिनिअर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या, प्रोफेसर डॉ. सौ. सुहासिनी नाईक ईटकर उपस्थित राहिल्या. 'मानवी जीवनातील साहित्याचे स्थान' या विषयावर श्री रव... See more










राजर्षी शाहू महाराज जयंती प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी




'एक पेड मॉ के नाम' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने गणोरी येथे वृक्षारोपण




सहविचार सभेत संस्थेची सैद्धांतिक भूमिका मांडताना पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा.श्री. निवृत्ती पाटील गावंडे




सहविचार सभेत समारोप प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना राज्यस्थान राज्याचे राज्यपाल तथा पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, मा.श्री.हरिभाऊ बागडे (नाना)



श्री संत सावता माळी महाराज यांच्या पुण्यतिथी व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून शिवछत्रपती महाविद्यालय, लासूर स्टेशन येथील मराठी विभागप्रमुख, प्रा.डॉ.नरसिंह कदम महाराज



१५ ऑगस्ट २०२४ रोजी माजी विद्यार्थी संघाच्या बैठकीचे आयोजन



दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील वाणिज्य विभागाच्या वतीने वाणिज्य मंडळाच्या उदघाटनप्रसंगी बोलताना डॉ. मनोज पगारे








दिनांक १७ ऑगस्ट २०२४ राज्यस्थानचे महामहीम राज्यपाल मा.हरिभाऊ बागडे (नाना) यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन





दिनांक २२.०८.२०२४ श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाच्या वतीने विद्यार्थी संवाद कार्यशाळेचे (विद्यार्थी उदबोधन वर्ग) आयोजन करण्यात आले.



दिनांक-२९/०८/२०२४ रोजी अंतर्गत गुणवत्ता निर्धारण केंद्र व महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन



दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी "अविष्कार क्लबचे' उद्घाटन करतांना डॉ.शशिकांत बंडेवार



दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र व राष्ट्रीय सेवा विभागाच्या वतीने शिक्षक दिनाप्रसंगी अध्यापन करतांना विद्यार्थी शिक्षक




**दिनांक ५ सप्टेबर २०२४ रोजी सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ उदघाटन व संशोधन व विकास कक्ष व्याख्यान कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना डॉ.दीपक भुसारे**




**दिनांक २५ सप्टेबर २०२४ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीप्रसंगी सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव येथील प्राचार्य, डॉ.सुहास मोराळे**



**दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी "संशोधन पद्धती" या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करतांना उपस्थित मान्यवर.**



दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन केंद्र आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात बीजभाषण करतांना मा.श्री. सुदर्शन महाराज कपाटे



दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन केंद्र आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात मार्गदर्शन करतांना डॉ.गजानन सानप



दिनांक ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी, हिंदी व इंग्रजी विभाग व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा संशोधन केंद्र आयोजित एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात पुस्तकाचे प्रकाशन करतांना मान्यवर



दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने व्याख्यान कार्यक्रमात बोलत असतांना डॉ. सचिन मोरे



दिनांक ६ डिसेंबर २०२४ रोजी 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी : एकाधिक प्रवेश आणि एकाधिक निर्गमन' या विषयावरील कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना डॉ.बाबसाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विध्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके




दिनांक ०३ जानेवारी २०२५ रोजी 'युथ फॉर डिजिटल लिटरसी व युथ फॉर माय भारत' ही संकल्पना घेऊन राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत असतांना डॉ.त्र्यंबक पाटील






दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी 'एकदिवसीय नवोदित लेखकांसाठीच्या कार्यशाळे'प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत असतांना प्रो.डॉ.महेश खरात




दिनांक ११ जानेवारी २०२५ रोजी 'एकदिवसीय नवोदित लेखकांसाठीच्या कार्यशाळे'प्रसंगी बीजभाषक म्हणून बोलत असतांना प्रो.डॉ.सर्जेराव जिगे



दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी 'स्कुल कनेक्ट-२ व वाचन संकल्प कार्यशाळे' प्रसंगी प्रो. डॉ. बी. एन. डोळे



दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी डॉ. जगदीशचंद्र बोस व्याख्यानमालेप्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, डॉ. पी.पी.शर्मा



दिनांक १६ जानेवारी २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेप्रसंगी उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर



दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी फुलंब्री येथे पद्मभुषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर स्मृतिप्रीत्यर्थ 'फुलंब्री संगीत महोत्सवाचे' उदघाटन करतांना मान्यवर




दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी कु. आरती प्रधान या विद्यार्थीनीला मान्यवरांच्या हस्ते सावताभूषण पुरस्कार प्रदान करतांना.



दिनांक २४ व २५ जानेवारी २०२५ रोजी दोन दिवसीय 'विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळे' प्रसंगी उपस्थित मान्यवर







दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ एकदिवसीय राष्ट्रीय वेबिनार-संत साहित्य व भारतीय ज्ञान परंपरा या विषयावरील वेबिनारचे आयोजन



दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी देरेगाव दरी येथे 'पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. बळीराम गायकवाड




दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी "गुणवत्ता सुधारणा व सर्वंकष मूल्यमापन" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेप्रसंगी उपस्थित मान्यवर



दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करतांना.




दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती' चे औचित्य साधून देरेगाव दरी याठिकाणी शिवनीतीवर व्याख्यान देतांना डॉ. दिनेश कचकुरे



दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान अर्थसहाय्याने आयोजित राष्ट्रीय परिषदेत बीजभाषक म्हणून मार्गदर्शन करतांना डॉ.विवेक कुमार




महाविद्यालय, फुलंब्री
GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
Lat 20.09485° Long 75.426475°
27/02/25 10:34 AM


GPS Map Camera
Phulambri, Maharashtra, India
Lat 20.091962° Long 75.425837°
27/02/25 10:20 AM




दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पी.एम.उषा यांच्या अर्थसहाय्याने महिला वसतिगृह ईमारत, ग्रंथालय ईमारत व सभागृह ईमारती' चा भूमीपूजन सोहळयाप्रसंगी महामहिम राज्यपाल, राज्यस्थान राज्य तथा पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, मा. श्री हरिभाऊ बागडे (नाना) व इतर संस्था संचालक मंडळ




दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ रोजी इतिहास विभागाच्या वतीने 'भारतीय इतिहास, राजकारण, समाज आणि संस्कृती या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनाप्रसंगी उपस्थित मान्यवर





**मराठी भाषा गौरव दिनानिमित्त व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करतांना**

**कवयित्री, प्रिया धारूरकर**






पदवी प्रदान समारंभाप्रसंगी महाविद्यालय प्रवेश द्वारापासून संचालन प्रसंगी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी




पदवी प्रदान समारंभाप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ.योगिता होके पाटील तसेच व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष, मा.श्री.देवजीभाई पटेल, सचिव, मा.श्री. निवृत्ती गावंडे पाटील, प्राचार्य, डॉ.एस.आर.टकले व डॉ.पांडुरंग कल्याणकर




दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती प्रसंगी विचार मांडताना प्रा.विलास बैले

# विविध वृत्तपत्रांनी दिलेली प्रसिद्धी

सकाळ

## शिक्षकांनी गुणवत्तेच्या अधिष्ठानाची कास धरावी

### निवृत्ती गावंडे : फुलंब्रीत संत सावता महाविद्यालयात सहविचार सभा

**फुलंब्री, ता. २७ (बातमीदार) :** पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या तत्त्व विचारांना उजाळा देत असताना समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आपले ज्ञान कसे पोचविता येईल, याचा विचार व्हावा; तसेच समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा. त्यात विद्यार्थी विकास, समाज, गाव आणि राष्ट्र विकास पुढे ठेवून आपण काम करावे. शिक्षकांनी गुणवत्ता अधिष्ठानाची कास धरली पाहिजे. यासोबतच नवोपक्रमाला चालना देण्याचा प्रयत्न करावा, असे मत पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे यांनी व्यक्त केले.

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेअंतर्गत आर्य चाणक्य आचार्यकुल प्रबोधिनी आयोजित सहविचार सभा २०२४-२५ चे आयोजन श्री संत सावता विद्यालयात शुक्रवारी (ता. २६) करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल, तर अध्यक्ष म्हणून सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती होती.

सूत्रसंचालन कैलास कुबेर यांनी केले, तर आभार संदेश सोनवणे यांनी मानले. या सत्राची जबाबदारी स्वामी ब्रह्मनंद विद्यालय, पिंप्रीराजा या संस्कार केंद्राने पार पाडली. यावेळी प्राचार्य, डॉ.एस.आर. टकले, मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण, मुख्याध्यापिका कल्पना उरणकर या सभेसाठी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व संस्कार केंद्रांचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Aurangabad, District-Today
28/07/2024 Page No. 6

छत्रपती संभाजीनगर, सोमवार, १९ ऑगस्ट २०२४ सकाळ ५

## फुलंब्रीत मुला-मुलींनी गाजवली मॅरेथॉन

### दोन गटांत घेण्यात आली स्वतंत्र स्पर्धा; वैभव शिंदे, गौरव चव्हाण विजेता

**फुलंब्री, ता. १८ (बातमीदार) :** पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या वाढदिवसानिमित्त श्री संत सावता संकुलाच्यावतीने फुलंब्री येथे शनिवारी (ता.१७) भव्य मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. पाच व तीन किलोमीटर या दोन गटांत मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आली. पाच किलोमीटर गटामध्ये वैभव शिंदे, तर, तीन किलोमीटर गटामध्ये गौरव चव्हाण यांनी प्रथम क्रमांकाने बाजी मारली.

या स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर, गंगापूर, सिल्लोड, धाराशिव व स्थानिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेनंतर विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलिस अधिकारी श्रीनिवास धुळे, प्राचार्य डॉ. एस.आर. टकले, संत सावता प्राथमिक गुरुकुलाचे प्राचार्य आप्पासाहेब चव्हाण, मुख्याध्यापिका कल्पना उरणकर, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. संदीप जगताप आदी उपस्थित होते. संबंधित स्पर्धेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले.

यावेळी प्रा.डॉ. राजश्री पवार, प्रा. डॉ. मंजूषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे, प्रा.डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. डॉ. दत्तात्रय येडले, प्रा.डॉ. सुरेश मुंढे, प्रा.डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा.डॉ. अश्विन रांजणीकर, प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा.डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. चंद्रनयन वाघमारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. जया राजपूत, प्रा. दिनेश कचकुरे, प्रा. भारत कुबेर, प्रा. अर्जुन शेजूळ, प्रा. स्वप्नील कुलकर्णी, दयानंद कांबळे, बाबासाहेब दाभाडे, विनोद तुपे, रमेश जगधने, जयराम जाधव, सुनील चौधरी, प्रशांत मिसाळ, उमेश नागरे, नीलेश गाडेकर व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.



**फुलंब्री :** शहरामध्ये मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेले स्पर्धक. (छायाचित्र : नवनाथ इधाटे, फुलंब्री)

#### पाच किलोमीटर गटातील विजयी स्पर्धक

- प्रथम - वैभव शिंदे, द्वितीय-योगेश पडुळे, तृतीय-सचिन सपकाळ, तर मुलींमध्ये प्रथम -प्रियंका ओकसा, द्वितीय-अमृता गायकवाड, तृतीय- सुहानी खोब्रागडे यांनी बाजी मारली.

#### तीन किलोमीटर गटातील विजयी स्पर्धक

- प्रथम-गौरव चव्हाण, द्वितीय-बबन रेवडे, तृतीय-प्रथमेश खिल्लारे, तर मुलीमध्ये प्रथम-जयश्री नरोडे, द्वितीय-धनश्री गुजराने, तृतीय-मयूरी म्हस्के यांनी बाजी मारली.

# ‘राष्ट्रीय शैक्षणिक धोरण’ विषयावर कार्यशाळा

फुलंब्री, ता. १५ (बातमीदार) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील शिक्षण विभाग आणि श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सदस्य डॉ. गजानन सानप, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, संचालक डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.आर. टकले यांनी केले.

यावेळी डॉ. सानप म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नीतीमधून विद्यार्थ्यांना घडायचे आहे. कारण कौशल्याधिष्ठित शिक्षण घेण्याची संधी या शैक्षणिक धोरणात आहे. यासाठी हा विषय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोचवणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र टाइम्स

# ‘स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य मोलाचे’

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



श्री संत सावता माळी कॉलेजमध्ये हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त कार्यक्रम आयोजिण्यात आला होता.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील इतिहास विभागातील प्रा. डॉ. भास्कर टेकाळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

डॉ. टेकाळे म्हणाले, 'निजामाच्या एकूण कारकिर्दीचा आढावा घेत असताना निजामच्या सम्राजाचा इतिहास मांडला. भारतातील एकूण संस्थानांचा आढावा घेतला. निजामाच्या काळात ५६२ संस्थाने होती. त्यातल्या हैद्राबाद संस्थानाचा आढावा घेतला. धर्म परिवर्तनाच्या माध्यमातून अन्याय होत होता. या अन्यायाला उत्तर म्हणून हा लढा उभा राहिला असे म्हणता येईल. यात शिक्षण, भाषा याच्यासाठीही लढा उभा राहिला. रझाकार यांच्या दहशतीबाबत विवेचन केले. या रझाकारांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी प्रत्येक गावागावात वंदे मातरम चळवळ सुरू झाली. व सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती तयार करण्याचे काम सुरू झाले. हैदराबाद संस्थान भारतामध्ये विलीन करण्यात यश आले. यात स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य मोलाचे आहे. हे विसरता येण्यासारखे नाही.' कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विजय पांडे यांनी केले.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विजय पांडे यांनी आभार मानले. या प्रसंगी प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. राजश्री पवार, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. डॉ. दत्तात्रये येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, प्रा. डॉ. संदीप जगताप, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे, दयानंद कांबळे, बाबासाहेब दाभाडे, प्रेम चव्हाण व महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स

# दीनदयाळ जयंती फुलंब्रीत साजरी

**फुलंब्री :** येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने पंडित दीनदयाळ जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी सिद्धेश्वर महाविद्यालय, माजलगाव येथील प्राचार्य डॉ. सुहास मोराळे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांचा परिचय प्रा. डॉ. महेश थोरात यांनी करून दिला. कर्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्याबद्दल शिवानी जाधव, पायल तावरे या विद्यार्थीनींनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी बोलताना डॉ. सुहास मोराळे म्हणाले, 'पंडित दीनदयाळ हे वक्ता, पत्रकार, राष्ट्रीय नेता असणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी 'एकात्म मानवदर्शन' हा विचार मांडला. त्यात शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचे एकत्र रूप म्हणजे मानव अशी संकल्पना मांडून व्यक्ती ही समष्टीशी, सृष्टी, परमेष्ठीशी जोडलेली आहे, असा विचार पंडितजींनी दिला. हा विचार परंपरेशी जोडलेला असल्याने या विचाराचा स्वीकार अनेक राजकीय पक्षांनी स्वीकारलेला दिसतो.'

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. उपस्थित मान्यवरांचे आभार कावेरी तावडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल तावरेने केले. या प्रसंगी प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. राजश्री पवार, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे, प्रा. डॉ. दत्तात्रये येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. अश्विन रांजणीकर आदी उपस्थित होते.

# सामाजिक विचारांचे न्यायिक अधिष्ठान असणारं व्यक्तिमत्त्व पं. दीनदयाळ उपाध्याय - डॉ. मोराळे

फुलंब्री : प्रतिनिधी

सामाजिक व राष्ट्रीय विचारांचे न्यायिक अधिष्ठान असणारं व्यक्तिमत्त्व म्हणजे पं दीनदयाळ उपाध्याय असे प्रतिपादन माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी फुलंब्री येथे बोलतांना केले.

फुलंब्री येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने बुधवारी पंडित दीनदयाळ जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले होते. उपस्थित मान्यवरांचा परिचय प्रा.डॉ.महेश थोरात यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्रा.डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी केले. पुढे बोलतांना डॉ. मोराळे म्हणाले की, पंडित दीनदयाळ हे वक्ता, पत्रकार, राष्ट्रीय नेता असणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी एकात्म मानवदर्शन हा विचार मांडला. त्यात शरीर, मन, बुद्धी व आत्मा यांचं एकत्र



रूप म्हणजे मानव अशी संकल्पना मांडून व्यक्ती ही समष्टीशी, सृष्टी, परमेष्ठीशी जोडलेली आहे. असा विचार पंडितजींनी दिला. हा विचार परंपरेशी जोडलेला असल्याने या विचाराचा स्वीकार अनेक राजकीय पक्षांनी स्वीकारलेला दिसून येतो. समाज व व्यक्ती यांच्याबद्दल चिंतन असणारे व्यक्तिमत्त्व असल्याने मानवता हा महत्त्वाचा विचार घेऊन दीनदयाळजींनी राष्ट्रासाठी कार्य केले आहे. त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला. आणि त्यात त्यांनी स्वतःला वाहून घेतले. व राष्ट्रीय जीवनाशी असलेलं संघटन उभं केलं. व सामान्य माणसांबद्दल हितावह भूमिकेला महत्त्वाचं स्थान दिलेलं दिसून येते असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार कु. कावेरी तावडे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पायल तावरे हिने केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व डॉ. राजश्री पवार, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे, प्रा. डॉ. दत्तात्रये येडले, प्रा. डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ.अश्विन रांजणीकर, डॉ.महेश थोरात, प्रा.डॉ. नितीन माळेगावकर, प्रा.डॉ.संदीप जगताप, डॉ.गणेश कुलकर्णी, प्रा.डॉ. दिनेश कचकुरे, दयानंद कांबळे, बाबासाहेब दाभाडे, प्रेम चव्हाण, विनोद तुपे, रमेश जगधने, जयराम जाधव, रत्नाकर जाधव, अजिनाथ पेरकर आदीसह महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

www.maharashtratimes.com

# महाराष्ट्र टाइम्स

अग्रलेख

आजचा गणपती

गुरुवारचे तापमान

## 'एनईपी'त कौशल्य प्रशिक्षणावर भर

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

'२१ व्या शतकातील गरजा लक्षात घेऊन नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाची निर्मिती करण्यात आलेली आहे. उच्च शिक्षण घेत असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भाषेची अडचण येऊ नये म्हणून या शिक्षणामध्ये मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर देण्यात आलेला आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण वाढवण्यासाठी २०३० पर्यंत उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे,' असे प्रतिपादन या डॉ. सचिन मोरे यांनी केले.

फुलंब्री येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या २०२४ - २०२५ या वर्षीच्या कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुवारी (१७ ऑक्टोबर) करण्यात आले. या वेळी डॉ. सचिन मोरे बोलत होते. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून डॉ. सचिन मोरे, डॉ. सुरेश मुंढे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अश्विन रांजणीकर होते.



डॉ. सचिन मोरे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

'नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणावर सुद्धा भर देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यात वाढ व्हावी यासाठी कौशल्य शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे. विद्यार्थ्यांचे सातत्याने व सर्वंकष मूल्यमापन व्हावे यासाठी धोरणानुसार वारंवार घटक चाचण्या घ्यावा लागत आहेत. सातत्याने मूल्यमापन करण्याच्या पद्धतीमुळे विद्यार्थ्यांना एक वेळच्या परीक्षेत अपयश आल्यास त्याला दुसऱ्या वेळेसच्या परीक्षेतून ते भरून काढता येणार आहे. विद्यार्थ्यांची वर्तणूक सुधारावी यासाठी मूल्य शिक्षणावर सुद्धा नवीन शैक्षणिक धोरणात भर देण्यात आलेला आहे,' असेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. सुरेश मुंढे म्हणाले, 'भारतीय ज्ञान परंपरेला नवीन शैक्षणिक धोरणामध्ये महत्त्व दिल्यामुळे नवीन पिढीला भारतीय ज्ञानाची ओळख होईल. भारत हा जगाला ज्ञान देणारा देश म्हणून ओळखला जातो. या भारतीय ज्ञानाची ओळख आपल्या विद्यार्थ्यांना होणे गरजेचे आहे.'

डॉ. अश्विन रांजणीकर अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले, 'मल्टिपल एंट्री आणि मल्टिपल एक्झिटमुळे विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणात काही कारणास्तव खंड पडल्यास, शिक्षणातील खंडानंतर त्याला पुन्हा आपले उच्च शिक्षण पुढे चालू ठेवता येईल आणि आपले शिक्षण पूर्ण करता येईल. या धोरणामुळे विद्यार्थ्यांना परत उच्च शिक्षणात येण्याची संधी मिळणार आहे उच्च शिक्षणात प्रवेश घेण्याची संधी मिळणार आहे.'

प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. यामध्ये त्यांनी कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला; तसेच आजीवन शिक्षण विभागाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल तावडे हिने केले. सुविचार पूजा उबाळे हिने सांगितला तर सुभाषित आदित्य वाघ यांनी सांगितले. समाधान दागोंडे यांनी आभार मानले. सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक

# सामना

## डॉ. संदीप जगताप यांच्या पेटंटला मान्यता

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्रीचे क्रीडा संचालक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. संदीप जगन्नाथ जगताप यांना नुकताच हिंदुस्थान पेटंट कार्यालय केंद्र सरकार तसेच युनायटेड किंग्डम या दोन्हीही देशांचे मार्किंग रोबोट फॉर स्पोर्ट्स फिल्ड आणि फुटबॉल स्पर्धेदरम्यान खेळाडूंच्या वर्तणुकीची नोंद करून ए.आय. तंत्राद्वारे वॉर्निंग कार्ड जनरेट करण्याचे अशा खेळातील दोन पेटंटला नुकतीच मान्यता मिळाली आहे.

पेटंट हे सायन्स, टेक्नॉलॉजी, इंजिनिअरिंग, मेडिकल क्षेत्रामध्ये प्रामुख्याने बघायला मिळतात, पण खेळामध्ये मराठवाड्यात प्रथमच डॉ. संदीप जगताप यांच्या माध्यमातून पेटंट मिळाले. या पेटंटमध्ये डॉ. जगताप यांच्या सोबत एमजीएम विद्यापीठाचे डॉ. श्रीनिवास मोतीयाळे, जळगाव विद्यापीठाचे डॉ. लिंबाजी प्रताळे, पुणे विद्यापीठाच्या डॉ. मीना पवार यांचा समावेश असून इंग्लंड (यू. के.) पेटंटमध्ये डॉ. महेश राजेनिंबाळकर, डॉ. माणिक राठोड, डॉ. अजय बडे, डॉ. अस्मा परवीन सय्यद, डॉ. बाळासाहेब सरपाते आदींचा समावेश आहे. क्रीडा क्षेत्रामध्ये पेटंट मिळवणारे कमी लोक असून डॉ. संदीप जगताप हे त्यातील एक ठरले. शारीरिक शिक्षणात संशोधनाची रुची असून त्यांनी खेळ व शारीरिक शिक्षण या विषयात सात पुस्तके प्रकाशित केली आहेत. तसेच अनेक आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदेमध्ये शोध पेपर सादर केले आहे. डॉ. जगताप यांनी जपान, साऊथ कोरिया, मलेशिया, मॉरिशस, थायलंड, नेपाळ आदी देशात अभ्यास दौरे केले आहेत.



त्यांच्या या यशाबद्दल पं. दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, कुलगुरू प्रो. डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, उपाध्यक्ष देवजी पटेल, सचिव निवृत्ती पाटील गावंडे, संचालक प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे, डॉ. प्रदीप जब्दे, प्राचार्य डॉ. सुभाष टाकले, उप-प्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, संशोधन समितीचे डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. महेश थोरात, डॉ. मंजुषा नळगिरकर, डॉ. राजश्री पवार, डॉ. अश्विन रांजणीकर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

Sambhajinagar Edition
Dec 6, 2024 Page No. 9
Powered by: erelego.com

अग्रलेख

महाराष्ट्र टाइम्स


# वाचन संस्कृतीसाठी मार्गदर्शन

## सर्वाधिक वाचणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता गुरुकुल विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय आयाम विभागाअंतर्गत मुख्याध्यापिका कल्पना उरणकर मार्गदर्शनाखाली ग्रंथालय विभाग आयाम प्रमुख स्वाती मंडळ; तसेच उपप्रमुख कल्पना मालोदे यांनी शासन देशानुसार एक जानेवारी ते १५ जानेवारी वाचन संस्कृती जागृती पंधरवाडा साजरा केला. या निमित्त शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमामध्ये मंगळवारी (सात जानेवारी) कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्राध्यापक डॉ. गणेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती जोपासण्याविषयी विशेष मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे डॉ. गणेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसाठी पुस्तक वाचनासंबंधी येत्या पंधरवड्यामध्ये एक स्पर्धा घोषित केली आणि विद्यार्थ्यांना सहभागाचे आवाहन केले.


श्री संत सावता गुरुकुल विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय आयाम विभागाअंतर्गत वाचन संस्कृती जागृती पंधरवाडा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमामध्ये विद्यालयाच्या ग्रंथालयामधून वर्षभरात जास्तीत जास्त पुस्तके घेऊन वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत व कौतुक करण्यात आले. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना उरणकर होत्या. प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अप्पासाहेब चव्हाण उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती मंडळ यांनी केले. कल्पना मालोदे यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी गुरुकुलातील सर्व शिक्षक, शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.


www.maharashtratimes.com

एकमेव नि:पक्ष वृत्तपत्र

अग्रलेख
निर्धार स्वागतार्ह, पण...

आजचा गणपती
ढोल्या गणपती, नाशिक
प्रेषक: महेश देशमुख, धायरी.

महाराष्ट्र टाइम्स

| बुधवारचे तापमान | छत्रपती संभाजीनगर |
|---|---|
| कमाल | २१.० |
| किमान | १०.३ |

छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, ९ जानेवारी २०२५ | पाने १२ (छत्रपती संभाजीनगर टाइम्ससह) | शहर आवृत्ती | ₹ ३.०० — वर्ष : १४ | अंक : ८

मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी readercontact@timesgroup.com वर ईमेल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.


## वाचन पंधरवडा उत्साहात

**फुलंब्री** : येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात ग्रंथालय विभागामार्फत वाचन पंधरवडा सुरू आहे. यामध्ये सामूहिक वाचन, ग्रंथ परीक्षण लेखन स्पर्धा, ग्रंथप्रदर्शन आणि वाचक संवाद इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. इंद्रनयन वाघमारे याच्या सहकार्याने श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय ग्रंथालय विभागामार्फत वाचन पंधरवडा सुरू आहे.

एक जानेवारीला सामूहिक वाचन, तीन जानेवारीला विद्यार्थ्यांसाठी वाचन कौशल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आठ जानेवारी रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी प्रा. विजय पांडे, प्रा. नितीन माळेगावकर, प्रा. मंजुषा नळगीरकर, प्रा. कडसर, प्रा. संजीवकुमार पांचाळ आणि विद्यार्थी उपस्थित होते.


श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात ग्रंथालय विभागामार्फत वाचन पंधरवडा सुरू आहे. यामध्ये ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र टाइम्स

# समाजाला आपलेसे करणे महत्त्वाचे

## डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री**

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे 'युथ फॉर डिजिटल लिटरसी व युथ फॉर माय भारत' ही संकल्पना घेऊन तीन जानेवारीपासून सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप गुरुवार (नऊ जानेवारी) रोजी गणोरी येथे करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर उपस्थित होते. तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, सरपंच सरला तांदळे, सोसायटीचे व्हाइस चेअरमन संतोष तांदळे, बाळासाहेब तांदळे, भाऊसाहेब तांदळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल होते.

प्रास्ताविक प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी केले. काही स्वयंसेवकांनी शिबिरादरम्यान आलेले अनुभव व मनोगत व्यक्त केले. सरपंच सरला तांदळे, संतोष तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर म्हणाले, 'आपण समाजाचे काही तरी देणे लागतो. त्यासाठी समाज, निसर्ग याला आपलेसे करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जगाचा तरुणांवर विश्वास आहे. तो विश्वास सार्थकी लावण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. तसेच राष्ट्रीय सेवा योजना ही राष्ट्रीय एकात्मता व चारित्र्य संवर्धन करण्याचं काम राष्ट्रीय सेवा योजना करते.' देवजीभाई पटेल म्हणाले, शिबिरातून विद्यार्थी चांगले विचार, स्वच्छता, पाण्याचे महत्व आणि राष्ट्राच्या उन्नतीचे काम आहे. ते काम विद्यार्थ्यांनी आनंदाने केले पाहिजे.' सूत्रसंचालन ऋतुजा अंभोरे हिने तर आभार प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी मानले.






## आनंदी जीवनशैली करण्यासाठी स्वयंसेवकांनी वाईट गोष्टींचा त्याग करावा – डॉ.टी.आर.पाटील

फुलंब्री :

**जाहीर प्रगटन**

# पद्मभुषण कृष्णराव फुलंब्रीकर फुलंब्री संगीत महोत्सव २०२५

दि. १७ – १८ – १९ जानेवारी २०२५



संकल्पना – संवर्धन – सहकार्य

देवगिरी संगीत प्रतिष्ठान

**शुक्रवार, दि. १७ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता**

उद्घाटन

**मा. आ. सौ. अनुराधाताई चव्हाण**
(आमदार, फुलंब्री विधान सभा मतदार संघ)

**मा. श्री. देवजीभाई पटेल**
(उपाध्यक्ष, पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था)

**मा. श्रीमती प्रिया फुलंब्रीकर** (स्व. कृष्णराव फुलंब्रीकर यांची नात)

स्थानिक कलाकार : **विविध कला दर्शन**

गायन

**अतुल खांडेकर, पुणे** (शास्त्रीय गायन व फुलंब्रीकरांची गीते)
साथ : **लिलाधर चक्रदेव** (संवादिनी) **प्रणव गुरव** (तबला)

**शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता**

नृत्य

देवमुद्रा नृत्य विद्यालय, व्ही. सौम्याश्री यांच्या शिष्या
**जाई अभ्यंकर ▸ अनुष्का पाटील** (भरतनाट्यम)

गायन

**ईश्वर घोरपडे** (पं.जितेंद्र अभिषेकी यांच्या बंदिशी, नाट्य-भाव-भक्ती गीते)
साथ : **शांतीभुषण देशपांडे** (संवादिनी) **पवन सिडाम** (तबला)
**पंकज शिरभाते** (व्हायोलीन) **गोपाळ खोमणे** (पखवाज)

**रविवार, दि. १९ जानेवारी २०२५, वेळ सायं. ६ वाजता**

प्रमुख उपस्थिती

**मा. श्री. हरिभाऊजी बागडे** (महामहीम राज्यपाल, राजस्थान)
**मा. आ. सौ. अनुराधाताई चव्हाण** (आमदार, फुलंब्री विधान सभा मतदार संघ)
**मा. श्री अतुलदादा चव्हाण** (मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे)
**मा. श्री. सुहासभाऊ शिरसाठ** (भा.ज.पा. जिल्हाध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर, ग्रामीण)
**मा. श्री. निवृत्ती गावंडे** (सचिव, पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था)
**मा. श्री. योगेश मिसाळ** (कार्याध्यक्ष, संगीत महोत्सव संयोजन समिती)

सांस्कृतिक कार्यक्रम

**द फोक आख्यान** (अस्सल मराठमोळ्या लोककलेचा अभिनव कार्यक्रम, पुणे )

विनित

पं. दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे
**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

**शांती प्रतिष्ठाण,किनगाव,** ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

स्थळ : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय (संकुल परिसर)
विवेकानंद नगर, सिल्लोड रोड, फुलंब्री, जि. छ. संभाजीनगर
वेळ सायं. ६.०० वा.

# तीनदिवसीय फुलंब्री महोत्सव शुक्रवारपासून

## 'द फोल्क आख्यान'चे आकर्षण : संगीत रसिकांसाठी पर्वणी

फुलंब्री, ता. १४ (बातमीदार) : मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त फुलंब्री महोत्सवाचे आयोजन ता. १७, १८ व १९ जानेवारी रोजी संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे करण्यात आले आहे. यानिमित्त फुलंब्री येथे पहिल्यांदाच 'द फोल्क आख्यान' या लोकसंगीतमय (कॉन्सर्ट) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या महोत्सवातून सामाजिक व सांस्कृतिक एकत्रिकरण होणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे येथील मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनात, आमदार अनुराधा चव्हाण यांच्या अध्यक्षतेत, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठानतर्फे हा महोत्सव होणार आहे. भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ म्हणाले, या कार्यक्रमांमध्ये सर्वांनी आपला सहभाग नोंदवून महोत्सवाची शोभा वाढवावी. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या संगीतमय कार्यक्रमांनी संपूर्ण महाराष्ट्र मंत्रमुग्ध झालेला आहे, असेही त्यांनी सांगितले.

### असे आहेत कार्यक्रम

- महोत्सवात ता. १७ रोजी सायंकाळी पाच ते सात दरम्यान संत सावतामाळी ग्रामीण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह स्थानिक लोककलाकारांचे सादरीकरण होईल. ता. १८ रोजी सायंकाळी सहा ते १० दरम्यान शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन व नाट्यसंगीताचे सादरीकरण देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या कलाकारांकडून होईल. ता. १९ रोजी सायंकाळी सहा ते रात्री १० दरम्यान 'द फोल्क आख्यान' हा प्रसिद्ध कॉन्सर्ट होईल.

सामाजिक व सांस्कृतिक एकात्मता जोपासली जावी, लोककलेला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवत या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, प्रेक्षकांना उच्च दर्जाचे सांस्कृतिक अनुभव मिळवेत व फुलंब्रीचे सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळक व्हावे, यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत आहे.

---

दिव्य मराठी | छत्रपती संभाजीनगर जिल्हा 15-01-2025

उत्सव • महोत्सवाला १७ जानेवारीपासून होणार सुरुवात

# फुलंब्रीत तीन दिवस लोककला, नाट्यसंगीत, शास्त्रीय गायन सोहळा

प्रतिनिधी | फुलंब्री

### राज्यपाल बागडे यांच्यासह मुख्य मान्यवरांची उपस्थिती

### महोत्सवाच्या तयारीत उत्साह

### स्थानिक कलाकारांना सहभागाची संधी

### महोत्सवाचे खास आकर्षण आणि वेळापत्रक

---

www.maharashtratimes.com

# महाराष्ट्र टाइम्स

अग्रलेख
या कोंडीतून सुटका नाही!

आजचा गणपती

मंगळवारचे तापमान

# विद्यार्थ्यांनी अनुभवविश्व समृद्ध करावे

## प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांचे मत

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील मराठी विभाग व विद्यार्थी कल्याण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे एकदिवसीय नवोदित लेखकांसाठीच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे यांच्या हस्ते करण्यात आले. तर बीजभाषक म्हणून प्रसिद्ध समीक्षक तथा विनायकराव पाटील महाविद्यालय, वैजापूर महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख, प्रा. डॉ. महेश खरात उपस्थित होते. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात अध्यक्ष म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे पालक संचालक, डॉ. प्रदीप जब्दे, तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती होती. कार्यशाळेचे प्रास्ताविक, मराठी विभागप्रमुख, प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी केले.

उद्घाटनप्रसंगी बोलतांना डॉ. सर्जेराव जिगे म्हणाले, 'शब्दाला अर्थ समाज देत असतो, अर्थात आपण अर्थ देत असतो. व्यक्त होता येणे म्हणजे लिहिणे असे मी समजतो. हे करत असताना शब्दांना विशिष्ट वळण देणे, त्या शब्दांना विशिष्ट ठिकाणी बसवणे या बाबी जमल्या की, कुणालाही लेखक होता येतं. म्हणून विद्यार्थ्यांनी किंवा ज्यांना ज्यांना लेखक व्हावे असे वाटते त्यांनी आपले वाचन आणि अनुभवविश्व समृद्ध करणे महत्त्वाचे आहे.'

डॉ. महेश खरात म्हणाले, 'कोणतेही लेखन हे विनाअर्थाचं असत नाही. तर साहित्याची सर्व रचना ही अर्थावर व साहित्याच्या सहितत्त्वावर अवलंबून असते. माणूस जन्माला येत असताना समज घेऊन येतो. हीच समज आपल्याला साहित्यातून मांडावी लागते.' विविध साहित्य प्रकारांवरील चिंतन मांडले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे पालक संचालक डॉ. प्रदीप जब्दे यांनी केला.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात एमजीएम विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागप्रमुख, डॉ. राजू सोनवणे व त्यांचा चमू यांनी नाटक व नाट्यसंहिता लेखन यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. नाटकाची संहिता म्हणजे काय, तिचे लेखन कसे करावे यासंबंधी विवेचन केले. दोन विनोदी प्रहसन करूनही दाखविले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री येथील डॉ. युवराज गहेराव यांनी केला. कविता लेखन व कथालेखन या विषयावर प्रा. डॉ. वीरा राठोड यांनी 'कविता ही आपल्या आतून आली पाहिजे. काळाच्या कुठल्याही टप्प्यावर गेले तरी माणसाच्या भल्यासाठी माणसाने गायलेले जे जे गाणे आहे, ती म्हणजे कविता,' असे मत व्यक्त केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. अनिरुद्ध मोरे यांनी केला. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. ज्ञानेश्वर शेजूळ यांनी साहित्य लेखन तंत्र आणि साहित्याची भाषा या अनुषंगाने विचार व्यक्त केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेसाठी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले.

महाराष्ट्र टाइम्स

# फुलंब्री महोत्सव उद्यापासून

## विविध लोककलांचे सादरीकरण

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

'मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त फुलंब्री महोत्सवाचे आयोजन १७, १८ व १९ जानेवारी रोजी फुलंब्रीतील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय येथे करण्यात आले आहे,' अशी माहिती पत्रकार परीषदेत अतुल चव्हाण यांनी दिली.

राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि आमदार अनुराधा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्यातर्फे फुलंब्री महोत्सवाचे आयोजन १७ जानेवारी, ते १९ जानेवारी या दरम्यान करण्यात आले आहे.

### असा असेल महोत्सव

- शुक्रवार, १७ जानेवारी : सायंकाळी पाच ते सायंकाळी सात : संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसह स्थानिक लोककलाकारांचे सादरीकरण.
- शनिवार, १८ जानेवारी : सायंकाळी सहा ते रात्री १० : देवगिरी संगीत प्रतिष्ठानच्या कलाकारांकडून शास्त्रीय नृत्य, शास्त्रीय गायन व नाट्यसंगीताचे सादरीकरण
- रविवार, १९ जानेवारी : सायंकाळी सहा ते रात्री १० : मराठवाड्यात पहिल्यांदाच 'द फोल्क आख्यान' हा लोकसंगीताचा कार्यक्रम होणार आहे.

पत्रकार परिषदेस भाजपचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, फुलंब्री महोत्सवाचे कार्याध्यक्ष योगेश मिसाळ, सुमीत प्रधान, गणेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

या महोत्सवाची माहिती देताना अतुल चव्हाण यांनी 'सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा आणि लोककलेला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, प्रेक्षकांसाठी उच्च दर्जाचे सांस्कृतिक अनुभव मिळावेत व फुलंब्रीचे सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळक व्हावे, यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत आहे,' असे सांगितले. 'या महोत्सवातील विविध कार्यक्रमांचा लाभ फुलंब्री तालुक्यासह जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा,' असे आवाहन आमदार अनुराधा चव्हाण, सुहास शिरसाठ, योगेश मिसाळ व आयोजन समितीच्या सदस्यांनी केले आहे.

नवराष्ट्र
www.navarashtra.com

मागणी पशुधन मालकांना केली आहे.

# फुलंब्री येथे उद्यापासून 'फुलंब्री महोत्सव'

फुलंब्री, (वा.) मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त, राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे अतुल चव्हाण यांच्या संकल्पनेतून व आमदार अनुराधा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ जानेवारीदरम्यान फुलंब्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे होणार आहे.

फुलंब्री महोत्सवासंदर्भात माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, शहराध्यक्ष योगेश मिसाळ उपस्थित होते. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून होणाऱ्या या महोत्सवात सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा आणि लोककलेला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, प्रेक्षकांसाठी उच्च दर्जाचे सांस्कृतिक अनुभव मिळावेत व फुलंब्रीचे सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळक व्हावे, यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत असल्याचे अतुल चव्हाण यांनी सांगितले.

Chhatrapati Sambhajinagar Plus Edition
Jan 16, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा 19-01-2025

# फुलंब्री संगीत महोत्सवाचे थाटात उद्‌घाटन; मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी | फुलंब्री

येथे पद्मभूषण मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर स्मृतिप्रीत्यर्थ पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री व शांतिनिकेतन प्रतिष्ठान किनगाव यांच्या संयुक्त विद्यमाने फुलंब्री संगीत महोत्सवाचे उद्‌घाटन शुक्रवारी सायंकाळी उत्साहात करण्यात आले. या वेळी अतुल चव्हाण, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले.

या वेळी अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल होते. संस्थेचे पालक संचालक डॉ. प्रदीप जब्दे, देवगिरी संगीत प्रतिष्ठानचे श्रीकांत उमरीकर, भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाट, योगेश मिसाळ, प्राचार्य डॉ. एस.आर. टकले, बाबासाहेब शिनगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अतुल चव्हाण म्हणाले की, हा महोत्सव आगामी काळात पूर्ण फुलंब्री तालुक्यासाठी व्हावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. येथील लोकांना संगीत कला याची ओळख करून देऊन संस्कृती जोपासण्याचे काम या महोत्सवामधून केले जाईल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या वेळी महाविद्यालयातील व परिसरातील कलाकारांच्या विविध कलागुणांचे सादरीकरण झाले. पं. जितेंद्र अभिषेकींच्या रचनांवर अतुल खांडेकर यांनी मास्तर कृष्णराव फुलंब्रीकरांची गीते व शास्त्रीय संगीत सादर केले. याचा आस्वाद फुलंब्री परिसरातील संगीतप्रेमी व शाळा-महाविद्यालयांमध ील विद्यार्थी-विद्यार्थ िनींनी घेतला.

नवराष्ट्र

www.navarashtra.com

मागणी पशुधन मालकांना केली आहे.

# फुलंब्री येथे उद्यापासून 'फुलंब्री महोत्सव'

फुलंब्री, (वा.) मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीनिमित्त, राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे अतुल चव्हाण यांच्या संकल्पनेतून व आमदार अनुराधा चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली, पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था व शांती प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने १७ ते १९ जानेवारीदरम्यान फुलंब्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे होणार आहे.

फुलंब्री महोत्सवासंदर्भात माहिती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, भाजप जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, शहराध्यक्ष योगेश मिसाळ उपस्थित होते. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून होणाऱ्या या महोत्सवात सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेचा आणि लोककलेला प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे, प्रेक्षकांसाठी उच्च दर्जाचे सांस्कृतिक अनुभव मिळावेत व फुलंब्रीचे सांस्कृतिक महत्त्व अधिक ठळक व्हावे, यासाठी ही अभिनव संकल्पना राबविण्यात येत असल्याचे अतुल चव्हाण यांनी सांगितले.

Chhatrapati Sambhajinagar Plus Edition
Jan 16, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com



**छत्रपती संभाजीनगर :** आंतरमहाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन करताना मान्यवर.

## किक बॉक्सिंगमध्ये १०५ खेळाडूंचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर, ता. १७ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ महाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेत बीड, जालना, धाराशिव व छत्रपती संभाजीनगर येथील विविध २२ महाविद्यालयांच्या १०५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

संत सावता माळी महाविद्यालय फुलंब्री, जिल्हा व शहर किक बॉक्सिंग संघटना यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली या स्पर्धा भरविण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाचे संचालक डॉ. प्रदीप जबदे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, पी.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी सूर्यवंशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. बप्पासाहेब मस्के उपस्थित होते. स्पर्धेत पंच म्हणून प्रथमेश राजपूत, देव चालक, नरेंद्र संतांसे, दत्ता शिंदे, संजना कोळी, प्रफुल दांडगे, उत्कर्ष सोपारकर यांनी काम पाहिले. विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी सूत्रसंचालन केले. किक बॉक्सिंग संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. सुरेश मिरकर यांनी आभार मानले.


छत्रपती संभाजीनगर
सकाळ TODAY
छत्रपती संभाजीनगर, शनिवार, १८ जानेवारी २०२५





**छत्रपती संभाजीनगर :** आंतरमहाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन करताना मान्यवर.

## किक बॉक्सिंगमध्ये १०५ खेळाडूंचा सहभाग

**छत्रपती संभाजीनगर, ता. १७ :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ महाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेत बीड, जालना, धाराशिव व छत्रपती संभाजीनगर येथील विविध २२ महाविद्यालयांच्या १०५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

संत सावता माळी महाविद्यालय फुलंब्री, जिल्हा व शहर किक बॉक्सिंग संघटना यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली या स्पर्धा भरविण्यात आल्या. स्पर्धेचे उद्घाटन विद्यालयाचे संचालक डॉ. प्रदीप जबदे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, पी.ई.एस. महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी सूर्यवंशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. बप्पासाहेब मस्के उपस्थित होते. स्पर्धेत पंच म्हणून प्रथमेश राजपूत, देव चालक, नरेंद्र संतांसे, दत्ता शिंदे, संजना कोळी, प्रफुल दांडगे, उत्कर्ष सोपारकर यांनी काम पाहिले. विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी सूत्रसंचालन केले. किक बॉक्सिंग संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. सुरेश मिरकर यांनी आभार मानले.



स्पोर्ट्स प्लस
क्रीडा क्षेत्राचे हक्काचे व्यासपीठ
स्पोर्ट्स प्लस संमिश्र | ७
शनिवार, १८ जानेवारी २०२५




## आंतर महाविद्यालयीन किकबॉक्सिंग स्पर्धेत १०५ खेळाडूंचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर : फुलंब्री येथील संत सावतामाळी महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन किकबॉक्सिंग स्पर्धेत २२ महाविद्यालयातयील एकूण १०५ खेळाडूंनी सहभाग घेत आपले कौशल्य दाखवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संत सावतामाळी महाविद्यालय व छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि शहर किकबॉक्सिंग संघटना यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली आंतर महाविद्यालयीन किकबॉक्सिंग स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी श्री संत सावता माळी ग्रामीण विद्यालयाचे संचालक डॉ. प्रदीप जबदे, प्राचार्य डॉ. सुभाष टकले, पीईएस महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी सूर्यवंशी, विद्यापीठ शारीरिक शिक्षण मंडळाचे सदस्य डॉ. बप्पासाहेब मस्के यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

या स्पर्धेत बीड, जालना, धाराशिव व छत्रपती संभाजीनगर येथील विविध २२ महाविद्यालयातील १०५ महिला व पुरुष खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत पंच म्हणून प्रथमेश राजपूत, देव चालक, नरेंद्र संतांसे, दत्ता शिंदे, संजना कोळी, प्रफुल दांडगे, उत्कर्ष सोपारकर यांनी काम पाहिले.

या स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा मंडळ सदस्य आणि छत्रपती संभाजीनगर जिल्हा व शहर किकबॉक्सिंग संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. सुरेश मिरकर यांनी आभार मानले.


लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू




फुलंब्री येथील संत सावता माळी महाविद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत आंतरमहाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेस नुकताच प्रारंभ झाला. या स्पर्धेत विविध २२ महाविद्यालयांतील १०५ खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

## फुलंब्रीत किक बॉक्सिंग स्पर्धेस प्रारंभ

**२२ महाविद्यालयांतील १०५ खेळाडूंचा सहभाग**

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** फुलंब्री येथील संत सावता माळी महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन किक बॉक्सिंग स्पर्धेस नुकताच प्रारंभ झाला. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरसह बीड, जालना, धाराशिव येथील विविध २२ महाविद्यालयातील १०५ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

स्पर्धेचे उद्घाटन श्री संत सावता माळी विद्यालयाचे संचालक प्रदीप जबदे, प्राचार्य सुभाष टकले, पी. ई. एस. महाविद्यालयाचे प्राचार्य शिवाजी सूर्यवंशी, विद्यापीठाचे क्रीडा संचालक संदीप जगताप, बप्पासाहेब म्हस्के, मंगेश डोंगरे, जिल्हा किक बॉक्सिंग संघटनेचे कार्याध्यक्ष सुरेश मिरकर यांच्या उपस्थितीत पार पडले.

पंच म्हणून प्रथमेश राजपूत, देव चालक, नरेंद्र संतांसे, दत्ता शिंदे, संजना कोळी, प्रफुल दांडगे, उत्कर्ष सोपारकर, आदी काम पाहात आहेत.


Chhatrapati Sambhajinagar Main
Page No. 10 Jan 18, 2025
Powered by: erelego.com


## पशुंच्या आरोग्यासाठी गोचीड व जंतांचे उच्चाटन करणे गरजेचे - डॉ.बळीराम गायकवाड

**फुलंब्री (प्रतिनिधी)** जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी पशुंच्या गोठ्याची स्वच्छता करून गोठ्यातील गोचीडांचे समूळ उच्चाटन केले पाहिजे असे प्रतिपादन डॉ.बळीराम गायकवाड यांनी बोलतांना केले.



संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्रीच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाने दरेगाव (दरी), येथे 'पशुधनाचे आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तसेच पशुधन विकास अधिकारी फिरते वैद्यकीय पथक फुलंब्रीचे डॉ. बळीराम गायकवाड उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच गुणाजी मालोदे उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ. गायकवाड म्हणाले की, गोचीड जनावरांचे रक्त शोषण करतात एक गोचीड जनावरांचे दररोज जवळपास ०३ मिली रक्त शोषण करतो. एका जनावराच्या अंगावर १०० गोचीडे गृहीत धरल्यास, दररोज गोचीडे एका जनावराचे २५० ते ३०० मिली रक्त शोषण करतात. त्यामुळे जनावरांमधील अशक्तपणा वाढत जातो. तसेच एक गोचीड हजारो अंडी देत असल्यामुळे जनावरांच्या अंगावरील गोचीडांची संख्या वाढत जाते. म्हणून सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन गोचीडांचे समूळ उच्चाटन करावे. तसेच पाळीव पशुंना वारंवार अलटून-पालटून जंताची औषध किंवा गोळ्या देणे गरजेचे आहे. पशुंनी खाल्लेल्या खाद्यातील निम्मे खाद्य जंत खाऊन घेतात, त्यामुळे जनावरे अशक्त होतात. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पांडुरंग यांनी केले, तर आभार प्रदर्शन सोसायटी चेअरमन शामराव मालोदे यांनी केले. यावेळी पोलीस पाटील बाबुराव मालोदे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मच्छिंद्र मालोदे, माजी अध्यक्ष दिनकर मालोदे, जालंदर गायकवाड, नाना मालोदे, दिनकर भाऊ मालोदे, दुध डेअरीचे चेअरमन प्रवीण मालोदे, केशवराव मालोदे, डॉ.अमोल मालोदे, डॉ. बी. जी. तुपकर, विठ्ठल दुधे, माजी सरपंच शावण सुरासे, वैष्णव निकेतन, शहाजी मालोदे, रामदास गरसोळे, कचरू प्रधान, असलम शेख आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयराम जाधव, अविनाश फुके यांनी सहकार्य केले.

महाराष्ट्र टाइम्स

# आरोग्य शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

फुलंब्री : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्रीच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने तालुक्यातील दरेगाव (दरी) येथे आरोग्य जागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावे ळी फुलंब्री ग्रामीण रुग्णालयातील डॉ. सिकंदर शेख, डॉ. विजय काथार व डॉ. नितीन म्हस्के यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले व त्यांच्या आरोग्याची तपासणी केली. डॉ. सिकंदर शेख म्हणाले, 'आपल्या आहाराबद्दल आपण जागरूक असावे. आहारात ज्वारी, बाजरीचे प्रमाण वाढवावे. गहू, तांदूळ व साखरेचे प्रमाण कमी करावे. रुग्णालयात जाऊन वारंवार आरोग्याची तपासणी करून घेत जावी.' डॉ. विजय काथार म्हणाले, 'शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक आरोग्य व्यवस्थित ठेवावे. मन प्रसन्न ठेवून बऱ्याच रोगांवर मात करता येते.' डॉ. नीती म्हस्के म्हणाल्या, 'व्यक्तीला आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी पुरेशी झोप घेणे गरजेचे आहे. .' या वेळी वयोवृद्ध व्यक्ती व महिलांच्या आरोग्याची



**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने तालुक्यातील दरेगाव (दरी) येथे आरोग्य जागृती व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**

तपासणी करून औषध देण्यात आले. समाधान दांगुडे याने सूत्रसंचालन केले, तर अंबादास दुतोंडे यांनी आभार मानले. प्रास्ताविक डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले. कार्यक्रमासाठी संकेत महाजन, सरपंच गुणाजी मालोदे, श्यामराव मालोदे, भावेश जाधव, जयराम जाधव आदींनी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# चांगली मुले घडली पाहिजेत – राज्यपाल बागडे

## कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाची सांगता



■ मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सव समारोप कार्यक्रमात बोलताना राजस्थानचे राज्यपाल बागडे.

**फुलंब्री :** मुले चांगली घडली पाहिजेत यासाठी त्यांना चांगल्या कथा, गिते ऐकण्यात त्याचप्रमाणे ते काय करतात आणि काय नाही याकडे पालकांनी बारकाईने लक्ष दिले पाहिजे असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले.

येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात १७ जानेवारी २०२५ पासून सुरु असलेल्या मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाचा समारोप १९ जानेवारी रोजी 'द फोक अख्यान'ने झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. द फोक अख्यान कार्यक्रमातील कलावंतांनी लोककला हीच आपल्या संस्कृतीच द्योतक आहे. हे आपल्या विविध लोककला प्रकार आणि गायनातून दाखवून दिले. दरम्यान यावेळी आ. अनुराधा चव्हाण यांनी उपस्थित श्रोत्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता व्यासपीठावर मुख्य अभियंता अतुल चव्हाण, श्रीकांत उमरीकर, योगेश मिसाळ यांच्यासह संत सावता संकुलातील प्राचार्य, मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि फुलंब्री परिसरातील संगीतप्रेमी उपस्थित होते.

Chhatrapati Smabhajinagar Edition
Jan 21, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

महाराष्ट्र टाइम्स



श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

# 'शिवरायांचे निर्णय जनहिताचे'

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून दरेगाव (दरी) येथे शिवनीतीचे अभ्यासाक डॉ. दिनेश कचकुरे यांचे समाज प्रबोधनपर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच, गुणाजी मालोदे उपस्थित होते.

डॉ. दिनेश कचकुरे म्हणाले, 'छत्रपती शिवाजी महाराजांनी जुलमी राजवट नाकारून सर्वसामान्यांना सोबत घेऊन स्वराज्य निर्माण केले. महाराज एक द्रष्टे राजे तसेच राज्यातील सर्वसामान्य जनतेचा व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारे होते. जिजामातेची शिकवण त्यांना होती. दुष्काळात राजांनी पाण्याचे योग्य जल व्यवस्थापन केले. वृक्ष आणि वनांचे संगोपन केले. कोणत्याही शेतकऱ्याचे झाड तोडावे लागल्यास, त्याला त्याचा योग्य मोबदला दिला जात असे. सैनिकांकडून शेतकऱ्यांच्या पिकाचे नुकसान होणार नाही, याची त्यांनी पूर्ण काळजी घेतली.' 'छत्रपती शिवाजी महाराजांनी घेतलेल्या निर्णयातून जनतेचे हीत साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी घेतलेले निर्णय आणि त्यांची वर्तणूक आजसुद्धा राज्यकर्त्यांना व सर्वसामान्यांना प्रेरणा देणारी आहे,' असे मत व्यक्त केले.

सूत्रसंचालन प्रा. भारत कुबेर यांनी केले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी केले तर आभार जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दरेगाव (दरी) गावातील शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. सरपंच गुणाजी मालोदे, उपसरपंच भाऊसाहेब मालोदे, नानाभाऊ मालोदे, बाबूराव मालोदे, बाजीराव मालोदे, कांबळे, शामराव मालोदे यांची उपस्थिती होती.

अग्रलेख
टोकेरी राष्ट्रवादाचा ट्रम्पोदय
आजचा गणपती
श्री तुळशीबाग गणपती, पुणे
प्रेषक : मयुरी देशमुख, कोथरूड, पुणे

www.maharashtratimes.com
एकमेव निःपक्ष वृत्तपत्र

महाराष्ट्र टाइम्स

मंगळवारचे तापमान

| | छत्रपती संभाजीनगर |
|---|---|
| कमाल | ३२.० |
| किमान | १३.९ |

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २२ जानेवारी २०२५ | पाने १४ (छत्रपती संभाजीनगर टाइम्ससह) | शहर आवृत्ती | ₹ ३.०० वर्ष : १४ | अंक : १९


मटामध्ये जाहिरात देण्यासाठी 18001205474 वर कॉल करा. 'महाराष्ट्र टाइम्स'चा अंक मिळविण्यासाठी readercontact@timesgroup.com वर ईमेल करा किंवा subscribe.timesgroup.com इथे जा.


# मुलांना महापुरुषांच्या कथा, चांगली गीते ऐकवावीत

## राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचा पालकांना सल्ला

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

'पालकांनी मुलांना थोर महापुरुषांच्या कथा व चांगली गीते ऐकवावी, त्यामुळे पिढी संस्कारित आणि जबाबदार होईल,' असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी सोमवारी फुलंब्रीत केले. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर तीन दिवसीय संगीत महोत्सवाची लोकगीतांच्या मेजवानीने सांगता झाली. या प्रसंगी राज्यपाल बागडे बोलत होते.



फुलंब्रीतील तीन दिवसांच्या संगीत महोत्सवाच्या सांगतेप्रसंगी हरिभाऊ बागडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

पंडित दीनदयाळ शिक्षण संस्थेचे संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, शांती प्रतिष्ठान किनगाव व देवगिरी संगीत प्रतिष्ठान यांच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवाचे उद्घाटन पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल यांच्या हस्ते झाले होते. या संगीत महोत्सवाची संकल्पना पुणे सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांची होती. या वेळी माजी नगराध्यक्ष सुहास शिरसाठ, संगीत महोत्सवाचे कार्याध्यक्ष योगेश मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी पुढे बोलतांना राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले, 'पालकांनी आपल्या मुलांना चांगली गीते, कथा ऐकवाव्यात. मुले काय करतात याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. मुलांवर योग्य संस्कार करण्याची गरज आहे. मुलांवर तुम्ही जसे संस्कार घडवणार तशीच मुले तयार होतील.' 'मुलांवर संस्कार होणे महत्त्वाचे असून तुम्ही जसे त्यांना घडवाल तसे ते घडतील त्यासाठी आपण प्रयत्न करावेत,' असा सल्लाही पालकांना त्यांनी या वेळी दिला.

'द फोक आख्याना'चे सादरीकरण कलाकारांना पवन सिडाम (तबला), शांतिभूषण देशपांडे (संवादिनी), पंकज शिरभाते (व्हायोलीन), गोपाळ खोमणे (पखवाज) यांनी सुरेल साथसंगत करून रसिकांची दाद मिळवली. त्यांचे शिष्य ओंकार लोहार आणि श्रीनिवास केचे यांनी गायन साथ केली. मराठी लोककला कार्यक्रम 'द फोक आख्यान' या वेळी सादर झाले. ढोलकी, संबळ, पखवाज, हलगी, दिमडी, पायपेटी, टाळ अशा वाद्यांचा, संगीताचा सुंदर आविष्कार या कार्यक्रमात होता. गवळण, अभंग, सुंबरान, गोंधळ, लावणी, जात्यावरच्या ओव्या सगळ्यांचा समावेश यात कलात्मकतेने करण्यात आला होता.

'मास्टर फुलंब्रीकर तालुक्याचे भूषण'

आमदार अनुराधा चव्हाण म्हणाल्या, 'मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी आपल्या तालुक्याचे नाव संगीत क्षेत्रात देशपातळीवर उमटवले आहे. हा फुलंब्रीसाठी मोठा गौरव आहे.' 'स्थानिक कलाकारांना या संगीत महोत्सवामुळे एक स्टेज मिळाले असून, या संगीत महोत्सवाची तीन दिवसीय परंपरा पुढेही चालू ठेवणार असून याचे स्वरूप पुढच्या वर्षी मोठे करण्यात येईल,' असे त्यांनी सांगितले.

कलाकारांचे उत्तम सादरीकरण

स्थानिक कलाकारांनी गायन, वादन, नृत्य सादर करून आपल्या कलाविष्काराचे दर्शन घडविले. त्यानंतर अतुल खांडेकर यांनी राग श्याम कल्याण व नंतर विविध नाट्यगीतांचे अतिशय बहारदार असे सादरीकरण केले. त्यांना तबल्यावर प्रणव गुरव व संवादिनीवर लीलाधर चक्रदेव यांनी साथसंगत केली. दुसऱ्या दिवशी नृत्यगुरू व्ही. सौम्याश्री यांच्या शिष्या जाई अभ्यंकर व अनुष्का पाटील यांनी भरतनाट्यम सादर केले. यात गणेश वंदना, तिल्लाना, अभंग, महिषासुरमर्दिनी स्तोत्रावर आधारित नृत्य सादर केले. तिसऱ्या दिवशी पंडित विजय कोपरकरांचे शिष्य ईश्वर घोरपडे यांनी राग तिलक कामोद सादर केला. मास्टर कृष्णराव फुलंब्रीकरांची बंदिशही त्यांनी आवर्जून सादर केली.

---

दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा 08-12-2024

उत्सव • मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. साळुंके यांच्या हस्ते उद्घाटन

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीवर कार्यशाळा

प्रतिनिधी | फुलंब्री

प्रधानमंत्री -उच्चतर शिक्षा अभियान (पीएम उषा) यांच्या अर्थसाहाय्याने व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने \'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी : एकाधिक प्रवेश आणि एकाधिक निर्गमन' या विषयाच्या अनुषंगाने शुक्रवार रोजी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजय साळुंके यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे निमंत्रित सदस्य, प्राचार्य डॉ. प्रदीप जब्दे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे हे होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. उद्घाटन सत्रात बोलत असताना डॉ. साळुंके म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण, जागतिकीकरण तसेच भारतीय ज्ञानपरंपरा या अनुषंगाने आपले मत व्यक्त केले. प्राचीन विद्यापीठामध्ये आपल्याकडील विद्यार्थी शिक्षण घेत होते. तेथील ज्ञान परंपराधिष्ठित होते हे विसरता येत नाही. गुरू ही संकल्पना महत्त्वाची होती हे यावरून लक्षात येते असे मत व्यक्त केले. उद्घाटन सत्रात प्राचार्य डॉ. प्रदीप जब्दे यांनी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये होणाऱ्या बदलांसंदर्भात तसेच विषय निवड व कौशल्ये याअनुषंगाने विद्यार्थ्यांशी हितगुज केले. उद्घाटनसत्राचा अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव मा. निवृत्ती गावंडे यांनी केला. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते डॉ. संजय साळुंके यांनी मार्गदर्शन केले. प्रस्तुत सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ. कैलास इंगळे यांनी केला. अध्यक्षीय समारोप करत असताना यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड येथील प्राचार्य डॉ. अशोक पंडित म्हणाले की, पूर्वी गुरुकुल पद्धती होती व त्या आवडीनिवडीनुसार शिक्षण दिले जात होते.

## आवडीच्या शिक्षणाचा फायदा व्हावा: प्राचार्य डॉ. लांब

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून इंद्रराज महाविद्यालय सिल्लोडचे प्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरण आणि त्यातले बदल सांगितले. आवडीचे शिक्षण मिळत आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी करून घ्यावा. तसेच नवीनतम कार्यकौशल्ये आहेत ती कौशल्ये आत्मसात करावी लागतील. ती कौशल्ये आत्मसात करण्याची संधी विद्यार्थ्यांना या शैक्षणिक धोरणातून मिळणार आहे. विद्यार्थ्यांना कधी प्रवेश करायचा व कधी बाहेर पडायचे ही संधी या धोरणाने मिळवून दिलेली आहे. त्याचा विचार विद्यार्थ्यांनी करावा.

महाराष्ट्र टाइम्स

दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर जिल्हा 25-02-2025

# सामाजिक संस्थावरील परिसंवादाला प्रतिसाद

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय यांच्या वतीने यशवंतराव चव्हाण कॉलेज, सिल्लोड आणि राजर्षी शाहू कॉलेज, पाथ्री यांच्या सहकार्याने भारतातील सामाजिक संस्थांचे रूपांतर या विषयावरील परिसंवाद यशस्वीपणे पार पडला.

या परिसंवादाचे आयोजन प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पीएम उषा) यांच्या अर्थसाह्याने महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने केले होते, ज्यामध्ये नामवंत शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या परिसंवादाचे प्रास्ताविक प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले व प्राचार्य, डॉ. सुनील मिरगणे यांनी केले. तर परिसंवादाची भूमिका समाजशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख, डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडली.

उद्घाटन सत्रात डॉ. विवेक कुमार (जेएनयू, नवी दिल्ली) यांनी प्रमुख वक्ते म्हणून सहभाग घेतला. त्यांनी भारताच्या सामाजिक संरचनेत झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांवर प्रकाश टाकला. देवजीभाई पटेल यांनी अध्यक्षस्थानी राहून आधुनिक भारतातील सामाजिक संस्थांच्या बदलत्या स्वरूपावर आपले विचार मांडले.

या समारंभाचे सूत्रसंचालन डॉ.माळेगावकर व आभार डॉ मोरे यांनी केले. डॉ राजू पोपळघट यांनी या परिसंवादाचे आयोजन केले होते. विविध महाविद्यालयांतून आलेल्या अभ्यासक, संशोधकांनी आपले संशोधनपर पेपरचे वाचन केले. या वेळी विद्यार्थी, कर्मचारी आणि शिक्षकांनी नसहभाग घेतला.

# पार्थी येथील परिसवांदात जेएनयूचे डॉ. विवेक कुमार यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी | फुलंब्री



उपस्थीतांना मार्गदर्शन करताना डॉ. विवेक कुमार .

प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान (पी.एम.उषा) यांच्या अर्थसाहाय्याने पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री. यशवंतराव चव्हाण कॉलेज, सिल्लोड आणि राजर्षी शाहू कॉलेज, पाथ्री यांच्या संयुक्त विद्यमाने \'भारतातील सामाजिक संस्थांचे रूपांतर' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन सोमवार रोजी राजर्षी शाहू कॉलेज, पाथ्री येथे करण्यात आले होते. प्रास्ताविक प्राचार्य एस. आर. टकले व प्राचार्य सुनील मिरगणे यांनी केले, तर परिसंवादाची भूमिका डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडली.

उद्घाटन सत्रात डॉ. विवेक कुमार (जे.एन.यू. नवी दिल्ली) यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. त्यांनी भारताच्या सामाजिक संरचनेत झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांवर प्रकाश टाकला. देवजीभाई पटेल यांनी अध्यक्षस्थानी राहून आधुनिक भारतातील सामाजिक संस्थांच्या बदलत्या स्वरूपावर आपले विचार मांडले.

या परिसंवादाचा मुख्य उद्देश पारंपरिक आणि आधुनिक संस्थांमधील बदल समजून घेऊन त्यांचा समाजावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे हा होता. या समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. माळेगावकर व आभार डॉ. मोरे सर यांनी केले. डॉ. राजू पोपळघट यांनी या परिसंवादाचे आयोजन केले होते.

पुढील सत्रात विविध महाविद्यालयांतून आलेल्या अभ्यासक, संशोधकांनी आपले संशोधनपर पेपरचे वाचन केले. कार्यक्रमाच्या समारोपात संयोजन समिती आणि सहभागी संस्थांच्या योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर संगीत महोत्सवाची लोकगीतांच्या मेजवानीने सांगता

## तीन दिवसीय संगीत महोत्सव : समारोपाला राज्यपाल हरिभाऊ बागडेंची उपस्थिती



दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 26-01-2025

# ‘कौशल्याच्या बळावर माणूस मोठाच होतो’

## श्री संत सावता माळी महाविद्यालयात कार्यशाळा

**प्रतिनिधी | फुलंब्री**

विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाच्या वाचनाबरोबरच बाहेर जगाचे सुद्धा ज्ञान घेतले पाहिजे. आत्मविश्वास व कौशल्याच्या बळावर माणूस मोठा होतो, अशी माहिती आजीवन शिक्षण विभागाचे संचालक प्रो. डॉ. सुधाकर शेंडगे यांनी दिली.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने शुक्रवारी, शनिवारी अशी दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. यात शनिवारी (दि. २५) डॉ. शेंडगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर ‘दिव्य मराठी’चे सॅटेलाइट हेड सुभाष बोंद्रे यांनी मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार संजीव राऊत उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. डॉ. सुधाकर शेंडगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासक्रमाच्या वाचनाबरोबरच बाहेर जगाचे सुद्धा ज्ञान घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कला आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. डॉ. एस. आर. टकले यांनीही मार्गदर्शन केले.

सुभाष बोंद्रे म्हणाले, “विद्यार्थ्यांनी जे वाचन केले आहे, ते त्यांनी प्रत्यक्ष व्यवहारात उतरवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत जाते. व्यक्तींमध्ये सकारात्मक विचार असले पाहिजेत. व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थ्यांत संभाषण कौशल्य पाहिजे असेही यावेळी त्यांनी सांगितेले. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी केले.

---

महाराष्ट्र जनशक्ति

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २७ फेब्रुवारी २०२५

# मराठी आमची मायबोली



ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज म्हणजे वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस " मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन च्या माध्यमातून एक उंची प्राप्त करून दिली आहे. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनात तिच्याविषयी आदर निर्माण केला. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या व्यथा, वेदनांना त्यांनी त्यांच्या भाषेत मोकळी वाट करून दिली.

कुसुमाग्रजांनी आपल्या लेखनीतून सामाजिक अन्याय, सामाजिक विषमता यावर कडाडून हल्ला चढविला. लेखनी चालवता चालवता ते सामाजिक चळवळीतही सहभाग घ्यायचे त्यामुळे त्यांच्या लेखनातील भाषेला एक धार यायची. तेज चढायचे. त्यांच्यात असणाऱ्या शोधक, चिकित्सक, समाजनिष्ठ दृष्टीने त्यांचे साहित्य समाजमनात रूजायचे.

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य असा एक भाग आहे. आपल्या मनातील भावना, विचार, अनुभव व्यक्त करण्यासाठी प्रत्येकाला भाषेचा उपयोग करावाच लागतो. मानव नेहमी एकमेकांशी संपर्क साधतो तो केवळ भाषेमुळेच. एका पिढीपासून दु स- या पिढीपर्यंत भाषेचा वारसा पोहचविणे म्हणजे सांस्कृतिक संक्रमण होय.

आपली संस्कृती व इतिहास भाषेत सामावलेला असतो. तो इतिहास, संस्कृती लेखक साहित्याचा माध्यमातून सांगत असतात. भाषेच्या विचारविनिमयामुळे परिवर्तन घडवून येत असते. ते परिवर्तन अनेक लेखकांनी घडवून आणले आहे. काही लेखकानी भाषेवर जीवापाड प्रेम केले.

तीला वाढविले. मनमनात तिच्याविषयी गोडी निर्माण केली. मराठी भाषा ही आपल्या हृदयाची भाषा आहे हे बिंबवले. भाषेच्या माध्यमातून क्रांतिकारकत्व सांगितले. सर्वांच्या सुख दु:खात तीला सामावून घेतले. म्हणून ती मोठी झाली. त्या अनेक लेखकांनपैकी कुसुमाग्रज हे एक होते. आपल्या कथा, कविता आणि नाटकाच्या माध्यमातून जनतेच्या मनावर अधिराज्य निर्माण केले. त्याला फक्त ही भाषाच जबाबदार आहे. भाषेने त्यांनाआणि समाजाला पर्यायाने देशाला फार किंमत मिळवून दिली. देशाचे सामाजिक, सांस्कृतिक वैभव खुलविले. त्यांच्या लेखनातील समाजनिष्ठ भाषेमुळेच त्यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो.

मराठी भाषा ही राजभाषा म्हणून ओळखली जाते. आजच्या स्थितीत मराठी भाषेची बरीच दुरावस्था निर्माण झाली आहे. ही बाब खरोखरच चिंताजनक आहे. आज मराठी भाषेला एक मरगळ म्हणा किंवा साचलेपणा आला आहे. त्यामुळे मराठी भाषेला आता नवसंजीवनी देणे गरजेचे आहे.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि मोबाईलमुळे भाषेची प्रचंड मोडतोड होताना दिसत आहे. या सर्व गोष्टींचा विचार आजच्या मराठी भाषा अभ्यासकांनी व अध्यापकांनी करणे आवश्यक आहे. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रातही सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. भाषेची मोडतोड होणार नाही म्हणून वाचन, लेखन, भाषण, श्रवण, शुध्दलेखन, शुध्दवाणी, भाषाप्रभुत्व अशा काही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जेणेकरून मराठी भाषेविषयी वाचकांच्या मनात आत्मियता निर्माण होईल. तिच्याविषयी गोडी निर्माण होईल. तिचा गौरव होईल. हे काम सतत भाषकांनी करायला हवे. भाषेचे संवर्धन करणे भाषकांचे काम आहे. कारण भाषक म्हणजे साहित्यिक भाषेला साहित्याचा माध्यमातून पुढे पुढे घेऊन जात असतो. भाषा मरत नसते तर भाषक मरत असतो. सुरेश भट म्हणतात..

"येथल्या दरीदरीत हिंडते मराठी येथल्या वनावनात गुंजते मराठी येथल्या तरूलतात सजते मराठी येथल्या कळीकळीत लाजते मराठी"

**प्रा. डॉ. सतीश मस्के**
मराठी विभागप्रमुख, कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे
मो. ७५०७५ ०४०४६

---

www.maharashtratimes.com
महाराष्ट्र टाइम्स मराठी भाषा गौरवदिन
छत्रपती संभाजीनगर | गुरुवार, २७ फेब्रुवारी २०२५ | पाने १२ (छत्रपती संभाजीनगर टाइम्ससह) | शहर आवृत्ती | ₹ ३.०० वर्ष : १४ | अंक : ५०

# ‘सामाजिक संस्थांमधील स्थित्यंतरे’वर चर्चासत्र

**समाजशास्त्र विषयाची दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद**

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



दोन दिवसांच्या परिषदेत सहभागी झालेले सदस्य.

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिल्लोड आणि राजर्षी शाहू कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालय पाथ्री या तीनही महाविद्यालयाने सामंजस्य करार अंतर्गत समाजशास्त्र विषयाची दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. ही परीषद श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात संपन्न झाली.

या राष्ट्रीय परिषदेचा मुख्य विषय 'भारतातील सामाजिक संस्थांमधील स्थित्यंतरे'वर हा होता. दोन दिवस या विषयावर विस्तृत अशी चर्चा झाली. या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याला उद्घाटक व बीजभाष म्हणून जेएनयू न्यू दिल्ली येथील समाजशास्त्र विभागाचे डॉ. विवेककुमार हे लाभले होते. अध्यक्षस्थानी देवजीभाई पटेल हे होते. प्रा. विवेक कुमार यांनी प्राचीन कालखंडापासून ते आधुनिक कालखंडामध्ये पर्यंत भारतीय समाजातील विविध संस्थांमध्ये कशी स्थित्यंतरे होत गेली या संदर्भात विस्तृत मांडणी केली. ऋग्वेद काळातील समाजामध्ये झालेले बदल व आताच्या काळात होणारे स्थित्यंतरे यामध्ये काय फरक आहे यासंबंधी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात डॉ. नारायण कांबळे यांनी भारतातील सामाजिक स्तरीकरणातील स्थित्यंतरे या विषयाच्या अनुषंगाने जात व लिंग या आधारावर कसे स्तरीकरणातील बदल होत आहेत यावर विस्तृत चर्चा केली. डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. एस. एल. गायकवाड यांनी स्थित्यंतरे ही संकल्पना नेमकी कशी अभ्यासावी; तसेच स्तरीकरणाचे कोणकोणते निकष असू शकतात या विषयावर साधकबाधक चर्चा केली. या दोन दिवशी राष्ट्रीय परिषदेसाठी एकूण १२२ प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ९८ प्राध्यापक व विद्यार्थी संशोधकाने संशोधन पेपर प्रकाशनासाठी देऊन पेपरचे वाचन केले.

दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रामध्ये लडाख, काश्मीर, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, जम्मू, पश्चिमबंगाल येथील प्राध्यापक व संशोधन विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने आपले पेपर वाचन केले. त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवसाच्या दुपारच्या सत्रामध्ये गोवा विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. अरविंद हळदनकर यांनी आदिवासी समाजातील स्थित्यंतरे या संदर्भात मार्गदर्शन केले तर डॉ. संदीप चौधरी यांनी अध्यक्षस्थान भूषविले.त्यानंतर समारोपाच्या सत्रामध्ये डॉ. बा. आं. मराठवाडा विद्यापीठाचे मानव विद्या शाखेचे अधिष्ठाता व समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. संजय साळुंखे यांनी भारतीय सामाजिक संस्थांमधील परिवर्तन, विकास व स्थित्यंतरे याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा अहवाल डॉ. गंगाधर मोरे यांनी वाचन केला.

उत्कृष्ट संशोधन पेपरसाठी दोन प्राध्यापक डॉ. मिलिंद घाटे व डॉ. मेघराज शिंदे तर दोन संशोधन विद्यार्थी डॉ. जयसिंग सिंगल व प्रतिभा अवताडे यांना पुरस्कार देण्यात आला. या पुरस्काराचे वाचन समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजू पोपळघट यांनी केले.

---

दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 28-02-2024

# श्री संत सावता गुरुकुल विद्यालय

**प्रतिनिधी | फुलंब्री**

श्री संत सावता गुरुकुल विद्यालयात मंगळवारी मराठी गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षा माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना उरणकर होत्या. प्रमुख उपस्थिती प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अप्पासाहेब चव्हाण यांची होती. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते संत सावता ग्रामीण महाविद्यालयाचे मराठी भाषा विभागप्रमुख डॉ पांचाळ होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा बागडे यांनी केले तर आभार उमेश नागरे यांनी मानले. या सर्व कार्यक्रमासाठी शिक्षक कृष्णा आढाव, संदीप व्यवहारे, प्रशांत मिसाळ, काकासाहेब काकडे ,दिनेश औटे, महेंद्र गंगावणे, सारिका खैरनार, सरस्वती ढाकणे, स्वाती मंडळ, योगिता गायके, अश्विनी खमाट, कल्पना गावंडे, कल्पना मालोदे, सविता पांचाळ,रूपाली ढोके, केशर राऊत, सुमित्रा वाघमारे, छाया लकडे, सुवर्णा जाधव, नीता मंडळ, नीलम शिंदे, कल्पना सोनवणे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी गणेश कुलकर्णी, नीलेश गाडेकर, योगेश जगधने, अरुण गोरे यांनी सहकार्य केले.

# दै. पुढारी



फुलंब्री : संत सावता गुरुकुलात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला.

## संत सावता विद्यालयात मराठी भाषा दिन

**फुलंब्री :** येथील संत सावता गुरुकुल विद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका कल्पना उरणकर या होत्या. प्राथमिकचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. संत सावता ग्रामीण महाविद्यालयाचे मराठी भाषा विभागप्रमुख प्रा.डॉ संजीवकुमार पांचाळ यांनी मराठी भाषेचे महत्त्व आणि साहित्यकार कुसुमाग्रज यांच्या विषयी विचार मांडले. इयत्ता नववीची विद्यार्थिनी पूनम चव्हाण हिने कुसुमाग्रज यांचे चित्र काढले होते. त्याबद्दल तिचे पुष्प देऊन कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन रेखा बागडे यांनी तर आभार उमेश नागरे यांनी मानले. यावेळी कृष्णा आढाव, संदीप व्यवहारे, प्रशांत मिसाळ, सुनील चौधरी, काकासाहेब काकडे ,दिनेश औटे, महेंद्र गंगावणे, सारिका खैरनार, सरस्वती ढाकणे, स्वाती मंडळ,योगिता गायके यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्र टाइम्स

# मराठी राजभाषा दिन उत्साहात

### श्री सावता गुरुकुल विद्यालयात कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

येथील श्री संत सावता गुरुकुल विद्यालयात मराठी राजभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना उरणकर होत्या. प्रमुख उपस्थिती प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण होते. प्रमुख वक्ते संत सावता ग्रामीण महाविद्यालयाचे मराठी भाषा विभागप्रमुख प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ होते. प्रमुख वक्ते आणि अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व आणि ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांची माहिती दिली. नववीची विद्यार्थिनी पूनम चव्हाण हिने कुसुमाग्रज यांचे रेखाचित्र काढले. सूत्रसंचालन रेखा बागडे यांनी केले, तर उमेश नागरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमासाठी शकृष्णा आढाव, संदीप व्यवहारे, प्रशांत मिसाळ, काकासाहेब काकडे, दिनेश औटे, महेंद्र गंगावणे, सारिका खैरनार, सरस्वती ढाकणे, स्वाती मंडळ, योगिता गायके, अश्विनी खमाट, कल्पना गावंडे, कल्पना मालोदे, सविता पांचाळ, रूपाली ढोके, केशर राऊत, सुमित्रा वाघमारे, छाया लकडे, सुवर्णा जाधव, नीता मंडळ, नीलम शिंदे, कल्पना सोनवणे, गणेश कुलकर्णी, नीलेश गाडेकर, योगेश जगधने, अरुण गोरे, ज्योती मैड यांची उपस्थिती होती.



पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचालित,

## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

पी. एम. उषा या योजनेअंतर्गत,

### महिला वसतिगृह इमारत, ग्रंथालय व सभागृह इमारतीचा

### ॥ भूमीपूजन सोहळा ॥

मा./श्री. ----------------------------------------------------------------

आपणांस कळविण्यास अत्यंत आनंद होतो की, हा भूमीपूजन सोहळा खालील मान्यवरांच्या शुभहस्ते आणि उपस्थिती मध्ये संपन्न होत आहे.

❋ शुभहस्ते ❋

**मा. श्री. हरिभाऊ बागडे (नाना)**

(महामहिम राज्यपाल, राजस्थान राज्य तथा अध्यक्ष, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर)

❋ कार्यक्रमाचे अध्यक्ष ❋

**मा. आमदार, सौ. अनुराधाताई अतुल चव्हाण** (आमदार, फुलंब्री विधानसभा)

❋ प्रमुख उपस्थिती ❋

**मा.श्री. अनिलजी भालेराव** (मा. प्रांत संघचालक, रा.स्व.संघ देवगिरी प्रांत)

**मा. श्री. सुहास शिरसाठ** (जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगर)

**मा. श्री अतुल चव्हाण** (मुख्य अभियंता, सा. बां. मंडळ, पुणे महाराष्ट्र शासन)

❋ विनीत ❋

देवजीभाई पटेल, उपाध्यक्ष

निवृत्ती पाटील गावंडे, सचिव

शिवाजीराव दांडगे, सहसचिव

विवेक हंबर्डे, कोषाध्यक्ष

आणि सर्व संचालक मंडळ,

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर

प्राचार्य डॉ. सुभाष टकले

आपण या भूमीपूजन सोहळ्यास उपस्थित राहून आमचा आनंद द्विगुणीत करावा. ही विनंती.

❋ स्थळ ❋
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर

❋ दिनांक व वेळ ❋
दिनांक-२७ फेब्रुवारी २०२५
सकाळी ९:३० वा.

महाराष्ट्र टाइम्स

# बौद्धिक क्षमतावाढीसाठी हवे शिक्षण

### राज्यपाल हरिभाऊ बागडे यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



हरिभाऊ बागडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

शिक्षण संस्थानी विद्यार्थ्यांचा पाया पक्का करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपले कर्तव्य पार पाडावे बौद्धिक क्षमता वाढीचं शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जावे असे प्रतिपादन राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी गुरुवार (२७ फेब्रुवारी) केले.

फुलंब्री येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात पी. एम. उषा उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत 'महिला वसतिगृह इमारत, ग्रंथालय इमारत व सभागृहचा भूमीपूजन सोहळा महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या शुभहस्ते विधियुक्त पार पडला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अनुराधा चव्हाण या होत्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनिल भालेराव, भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ, संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल, सचिव, निवृत्ती गावंडे, सहसचिव शिवाजी दांडगे, कोषाध्यक्ष, विवेक हंबर्डे, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्तविक निवृत्ती गावंडे यांनी केले. तर देवजीभाई पटेल, सुहास शिरसाठ, अनिल भालेराव यांनी यावेळी संस्थेच्या वाटचालीबद्दल मनोगत व्यक्त केले. बागडे म्हणाले, 'शिक्षण संस्थानी विद्यार्थ्यांचा पाया पक्का करणे हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून आपले कर्तव्य पार पाडावे. हे कर्तव्य आमची पंडित दीनदयाळ शिक्षण संस्था पार पाडत आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. चांगले शिक्षण द्यायचे असेल तर तेवढ्या भौतिक सुविधा प्रत्येक शाळा महाविद्यालयांमध्ये असणे आवश्यक आहे.' अध्यक्षीय समारोप आमदार अनुराधा चव्हाण यांनी केला.

या प्रसंगी दामोधर नवपुते, मंगलाताई वाहेगांवकर, बच्चूभाई पटेल, योगीराज देशमुख, योगेश मिसाळ, दिनकर गावंडे, साईनाथ इधाटे, तहसीलदार, कृष्णा कानगुले, पोलिस निरीक्षक, संजय सहाणे, धनंजय पुंड, गजानन नागरे, नरेंद्र देशमुख, पवन तिवारी, गुणाजी मालोदे, श्यामराव मालोदे महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी प्रा. डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र टाइम्स



श्री सावता महाविद्यालयात शिवजयंती साजरी करण्यात आली.

## सावता महाविद्यालयात कार्यक्रम

**फुलंब्री :** येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या वतीने बुधवार ( १९ फेब्रुवारी ) शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, इतिहास विभागप्रमुख, प्रा. विजय पांडे यांनी केले. या वेळी शिवविचारांवर मराठी विभागाच्या प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी आपले विचार व्यक्त केले. 'छत्रपती शिवाजी महाराज हे जनतेचे होते. स्वराज्य हे त्यांना त्यांचे वाटायचे आणि तेवढेच ते त्यांच्यावर प्रेम करायचे रयतेला सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले,' असे त्या म्हणाल्या.


अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. या प्रसंगी प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. राजश्री पवार, प्रा. विजय पांडे, डॉ. रामकिशन लोमटे, प्रा. डॉ. दत्तात्रये येडले, डॉ. सुरेश मुंढे, प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, प्रा. डॉ. संदीप जगताप, प्रा. भारत कुबेर, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे, श्री दयानंद कांबळे, श्री विनोद तुपे, रत्नाकर जाधव, जयराम जाधव, रमेश जगधने, अजिनाथ पेरकर उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा 03-03-2025

**कार्यक्रम** • सावता माळी महाविद्यालयात इतिहास विषयाची दोनदिवसीय राष्ट्रीय परिषद उत्साहात

## समाजातील प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्यावर असते : डॉ. शरद हेबाळकर

प्रतिनिधी | फुलंब्री



राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन करतांना मान्यवर दिसत आहे.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर आणि राजर्षी शाहू कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय पाथ्री या तिन्ही महाविद्यालयांच्या इतिहास विभागाच्या वतीने 'भारतीय इतिहास, राजकारण, समाज आणि संस्कृती' या विषयावर सामंजस्य करारांतर्गत दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे उद्‌घाटन डॉ. शरद हेबाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजय मून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे हे होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले, तर भूमिका प्रा. विजय पांडे यांनी मांडली. डॉ. शरद हेबाळकर म्हणाले की, समाजाच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची जबाबदारी शिक्षक म्हणून आपल्यावर असते. कारण शिक्षक कधी थकतही नाही आणि विकतही नाही. आध्यात्मिक ग्रंथाचे संदर्भ देत इतिहासाची मांडणी करत असताना हेबाळकर म्हणाले की, भारताचा इतिहास हा संघर्षाचा राहिलेला आहे. परंतु, आपण दुसऱ्याचे गुलाम कसे होतो हे आपल्या मनावर ठसलेले आहे. म्हणजे खरा इतिहास आपल्यापर्यं अद्याप आलेला नाही. कार इतिहासात झालेली आक्रमणे देशावर नसून ती माणसांवर होती आपण लक्षात घ्यावे, असेही म्हणाले. यावेळी मान्यवरां उपस्थिती होती.

### उत्कृष्ट शोधनिबंधाकाला दिली पारितोषिके

परिषदेच्या समारोप सत्रात साधन व्यक्ती म्हणून प्राचार्य डॉ. व्यंकटेश लांब यांनी इतिहास विषयातील संशोधनाच्या विविध पद्धती, विषय निवड व इतिहास विषयातील नवे प्रश्न तसेच विषय निवडीत वैविध्यता असायला हवी, संशोधनाचा समाजाला फायदा झाला पाहिजे. या अनुषंगाने विचार मांडले. या वेळी उत्कृष्ट शोधनिबंध व शोधनिबंध वाचनासाठीचे पारितोषिके देण्यात आली.

# शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला सुंदर प्रवास -डॉ. योगिता होके

**फुलंब्री : प्रतिनिधी**

शिक्षण हा विध्यार्थ्यांच्या आयुष्यातला सुंदर असा प्रवास आहे. या प्रवासात घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन समाजासाठी करावे असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. योगिता होके यांनी बोलतांना केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने 'पदवी प्रदान समारंभ' यशस्वीपणे पार पडला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. योगिता होके, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले. तर याप्रसंगी संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

पुढे बोलतांना बोलत डॉ. योगिता होके म्हणाल्या की, आपणांस सन्मानाने पदवी देण्यात आम्हाला आनंद वाटतो. परंतु, प्रत्येक विध्यार्थ्याने वास्तव स्वीकारून आपले मार्गक्रमण करणे आवश्यक असते. आपण केलेल्या कामाचे समाधान आपल्याला या पदवीमधून मिळत असते. या पदव्या आपल्याला घेता याव्यात व सन्मानाने जगता यावे यासाठी शिक्षणाची कवाडं आपल्यासाठी खुली करण्यासाठी अनेक लोकांनी संघर्ष केला आहे. ज्यांनी समाजाला ज्ञान देत देशाला संविधान दिलं याचा पुरेपूर उपयोग विद्यार्थ्यांनी करून घ्यावा. म्हणून शिक्षण घेताना आपल्यामध्ये ज्ञान घेण्याची वृत्ती असली पाहिजे नाही तर जगण्याची दशा होते, असे मत व्यक्त केले. या पदवी प्रदान समारंभात एकूण ५५ ते ६० विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. समारंभाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. मंजुषा नळगीरकर व डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले. यावेळी डॉ. राजश्री पवार, डॉ. मंजुषा नळगीरकर, प्रा. विजय पांडे, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. दत्तात्रय येडले, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. अश्विन रांजणीकर, डॉ. महेश थोरात, डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. संदीप जगताप, प्रा. चंद्रनयन वाघमारे, प्रा. स्वाती ढंगारे, प्रा. अरुण परदेशी, प्रा. उज्वला साबणे, अजिनाथ पेहरकर, दयानंद कांबळे, प्रेम चव्हाण, बाबासाहेब दाभाडे, विनोद तुपे, रत्नाकर जाधव, जयराम जाधव यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

महाराष्ट्र टाइम्स

## 'शिक्षण हा सुंदर प्रवास'

**फुलंब्री :** शिक्षण हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातला सुंदर असा प्रवास आहे. या प्रवासात घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन समाजासाठी करावे,' असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. योगिता पाटील होके यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने 'पदवी प्रदान समारंभ' यशस्वीपणे पार पडला. प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. योगिता पाटील होके उपस्थित होत्या.

संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर व डॉ. अश्विन रांजणीकर यांनी केले. आभार डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी मानले. या प्रसंगी डॉ. राजश्री पवार, प्रा. विजय पांडे, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. दत्तात्रय येडले आदी उपस्थित होते.

प्रसिध्दी विभागप्रमुख,
प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ

प्राचार्य,
डॉ.एस.आर.टकले